




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २३६ ■ शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


# अमेरिका-इस्त्रायल युद्धाच्या झळा पोहचल्या



प्रतिनिधी ६ मार्च

**पुणे :** अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा आज सातवा दिवस आहे. दोन्ही बाजूंनी हल्ले सुरू असून सध्या पश्चिम आशियात परिस्थिती तणावपूर्ण आहे. युद्धात इराणमध्ये सर्वाधिक जीवितहानी झाली असून आतापर्यंत १४०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे.

इराण हा जगातील प्रमुख तेल उत्पादक देशांपैकी एक आहे.

युद्ध अधिक भडकल्यास, पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. याचा परिणाम कच्च्या तेलाच्या किमतीवर होऊन, त्यात मोठ्या प्रमाणावर वाढ होऊ शकते आणि याचाच परिणाम आता भारतामध्ये जाणवू लागल्या आहेत. इराण, अमेरिका, इस्त्रायल युद्धाच्या झळा आता भारतापर्यंत पोहोचल्या आहेत.

## पुण्यात व्यावसायिक वापरासाठीचा गॅस पुरवठा बंद

युद्धाच्या झळा आता भारतापर्यंत पोहोचवू लागल्यात. इराण आणि इस्त्रायल-अमेरिकेतील युद्धामुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम होऊ लागल्याने व्यवसायिक वापराच्या गॅस सिलेंडरचा पुरवठा कालपासून थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. घरगुती वापराचा गॅस पुरवठा लोकांना व्यवस्थित होत रहावा, यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचं सांगितलं जात आहे. पुण्यातील बीपीसीएलच्या शिक्रापूर इथल्या प्लांटमध्ये आणि चाकणमधील एचपीसीएलच्या प्लांटमध्ये व्यावसायिक वापराचे सिलेंडर देणं बंद करण्यात आलं आहे. डीलर्सनी व्यवसायिक वापराच्या सिलेंडर्ससाठी गाड्या पाठवू नयेत अशा सुचना त्यांना देण्यात आल्या आहेत.

## तेल कंपन्यांचा डीलर्सना नेमका मेसेज काय

प्रिय डिलर्स, युद्धजन्य परिस्थितीमुळं कमर्शियल वापराचा गॅस पुरवठा थांबवण्यात येत आहे. सिलेंडर्स घेऊन जाण्यासाठी पुढील सूचनेपर्यंत कृपया गाड्या पाठवू नका. परिस्थिती सुधारली की लगेच कळवले जाईल.हॉटेल्स, कॅफे, धाबा, केटरिंग सर्विसेस आणि रेस्टॉरंट्स, बेकरी, मिठाईची दुकाने वगैरे, हॉस्पिटल्स आणि ऑफिस कँटीन्स, सेरॅमिक्स, वस्त्रोद्योग, धातू वितळवणारे, पावडर कोटिंग करणारे कारखाने यामध्ये हे खाजगी गॅस वापरला जातो.

## इराणवरील हल्ल्याचे कारण काय ?

२०२५ मध्ये इराण-इस्त्रायल युद्ध आणि इराण समर्थित गटांशी झालेल्या संघर्षांमुळे इस्त्रायच्या नेत्यांनी जानेवारीमध्ये इराणला वारंवार इशारा दिला होता की, ते त्यांच्या अण्वस्त्र कार्यक्रम आणि क्षेपणास्त्र क्षमतांचा अनियंत्रित विस्तार करू देणार नाहीत. परंतु, इराणने अशा कोणत्याही गोष्टींना जुमानले नाही. इराणने आपला संवेदनशील अण्वस्त्र कार्यक्रम आणि क्षेपणास्त्र संबंधित प्रक्रिया सुरूच ठेवल्या. अनेकदा इशारे देऊनही इराण थांबत नाही, असे दिसताच इस्रायल आणि अमेरिकेने इराणची राजधानी तेहरानवर हल्ला चढवला, ज्यामुळे मध्य पूर्वेत पुन्हा एकदा तणाव निर्माण झाल्याचे पाहायला मिळत आहे.

# भारत न्यूझीलंड सोबत झुंजणार टी-20 वर्ल्डकप फायनलमध्ये !



प्रतिनिधी ६ मार्च

**मुंबई:** भारतीय संघाने सलग दुसऱ्यांदा आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या फायनलमध्ये प्रवेश केला आहे. आयसीसी टी २० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील दुसऱ्या सेमी फायनलचा सामना भारत आणि इंग्लंड संघांमध्ये मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर गुरूवारी रात्री झाला. सात धावांनी भारतीय संघ विजयी झाला.

पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय संघाने २५३ धावांचा डोंगर उभारला होता. इंग्लंडला हा सामना जिंकण्यासाठी आणि फायनलमध्ये प्रवेश करण्यासाठी विक्रमी २५४ धावांचा यशस्वी पाठलाग करायचा होता. यासाठी जेकब बेथल आणि विल जॅक्सने पूर्ण जोर लावला, पण भारतीय संघाने हा सामना ७ धावांनी जिंकून फायनलमध्ये प्रवेश केला आहे. आता अहमदाबादमध्ये ८ मार्चला जेतेपदासाठी भारत न्यूझीलंडशी भिडणार आहे.

इंग्लंडला हा सामना जिंकण्यासाठी २५४ धावा करायच्या होत्या, पण इंग्लंडचा संघ २४६ करू शकला. इंग्लंड कडून जेकब बेथल आणि विल जॅक्सने इंग्लंडला विजयाच्या जवळ आणले. विल जॅक्स ३५ धावा करून माघारी परतला, पण बेथलने शतकी खेळी केली. आणि इंग्लंडला विजयाच्या अगदी जवळ पोहोचवले.

भारताकडून संजू सॅमसन आणि इशान किशनने ४५ चेंडूत ९७ धावांची भागीदारी केली. यासह युवराज सिंग आणि रॉबिन उथप्पाच्या जोडीचा रेकॉर्ड मोडून काढला. इशान किशन आणि संजू सॅमसनने केलेली भागीदारी ही आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील नॉकआऊट सामन्यांमध्ये कुठल्याही भारतीय जोडीने केलेली सर्वोच्च भागीदारी आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अर्थसकंल्पाला राज्य मंत्रिमंडळाकडून मंजुरी देण्यात आली आहे. अर्थसंकल्पापूर्वी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीला सुरुवात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मंत्र्यांची उपस्थिती सोबत अर्थराज्यमंत्री आशिष जैस्वाल देखील बैठकीला उपस्थित होते.

# अकोल्यात स्वीकृतसाठी काँग्रेस, उद्धव सेनेची मोठी चाल

प्रतिनिधी ६ मार्च

**अकोला:** आगामी राजकीय समीकरणे लक्षात घेता, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने अकोल्यात मोठी खेळी खेळली आहे. आमदार नितीन देशमुख यांनी सर्वांना धक्का देत, प्रभाग २० मध्ये कडवी झुंज देणारे शंकर लंगोटे यांची स्वीकृत नगरसेवक पदासाठी निवड केली आहे. या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ माजली असून, विशेषतः खडकी भागात शिवसेनेने आपले लक्ष केंद्रित केल्याचे





स्पष्ट होत आहे. जानेवारी महिन्यात झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग २० (खडकी) मधून शंकर लंगोटे यांनी अत्यंत चुरशीची लढत दिली होती. भाजपचे दिग्गज नेते विनोद मापारी यांच्याशी झालेल्या थेट लढतीत लंगोटे यांचा निसटता पराभव झाला होता. केवळ २३९ मतांच्या फरकाने त्यांना पराभवाचा सामना करावा लागला होता. मात्र, त्यांच्या या कामगिरीची आणि प्रभागातील सामाजिक कार्याची दखल घेत पक्षाने त्यांना आता मोठी संधी दिली आहे. काँग्रेसने ऐनवेळी गुड्डु पठाण आणि आकाश कवडे यांना संधी दिली. विनोद मापारी यांच्यासारख्या युवा नेत्याला त्यांच्याच बालेकिल्ल्यात रोखण्यासाठी शिवसेनेने लंगोटे यांना बळ दिले आहे. शंकर लंगोटे यांनी खडकी भागात केलेल्या कामामुळे जनतेचा त्यांच्याकडे ओढा आहे, हे निवडणुकीच्या निकालावरून स्पष्ट झाले होते. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आमदार नितीन देशमुख यांनी ही नियुक्ती करून खडकी भागात शिवसेनेची पकड मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे.

# भाजपचे चौघे महापालिकेचे स्विकृत सदस्य होणार

प्रतिनिधी ६ मार्च

**अकोला:** अकोला महानगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवक पदासाठी भाजपच्या गोटातून चार नावांवर शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा रंगली आहे. पक्षाने या निवडीमध्ये 'अनुभव' आणि 'निष्ठा' या दोन्ही गोष्टींचा समतोल राखण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. आज चौघांनी उमेदवारी अर्ज दाखल करत विजय निश्चित केला आहे. आज या चौघांनी स्विकृत नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल केला आहे. शिष्य आणि गुरू एकाच वेळी महापालिकेत असतील.

माजी नगरसेवक ॲड. गिरीश गोखले यांना पुन्हा संधी देऊन भाजपने महापालिकेत आपली कायदेशीर आणि तांत्रिक बाजू भक्कम केली आहे. गोखले यांचा महापालिकेच्या कामकाजाचा दांडगा अनुभव आहे. सभागृहात विरोधकांच्या आक्रमकतेला कायदेशीर ढाल म्हणून थोपवण्यासाठी त्यांचा उपयोग होईल.

भाजपचे सरचिटणीस ॲड. देवाशिष काकड यांच्या नावाची चर्चा पक्षनिष्ठेचा विजय म्हणून पाहिली जात आहे.रामदास पेठ मतदारसंघातून उमेदवारी कापली गेल्यानंतरही त्यांनी पक्षकार्यात सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांच्या निवडीमुळे संघटनेतील कार्यकर्त्यांना सकारात्मक संदेश गेला असून पक्ष संघटना अधिक मजबूत होण्यास मदत होईल.शहर सुधार आघाडीला सातत्याने मदत करणारे आणि महापालिकेच्या कामकाजाची खडानखडा माहिती असणारे ज्येष्ठ सदस्य सुनील मेश्राम यांची वर्णी लागली आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा प्रशासकीय निर्णयांमध्ये होऊ शकतो. या जागेसाठी आधी सागर शेगोकार आणि विनोद मनवानी यांच्या नावांची जोरदार चर्चा होती. मात्र, तांत्रिक कारणांमुळे किंवा कागदपत्रांच्या पूर्ततेअभावी त्यांची नावे मागे पडली आणि चंदा शर्मा यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याचे समजते.भाजपने या यादीत दोन वकिलांना स्थान देऊन महापालिकेतील आगामी कायदेशीर पेच आणि चर्चेत आपली सरशी होईल, याची पूर्ण खबरदारी घेतली आहे.



## निवडणुकीपुर्वी टळले बंड म्हणून....

मुंबई स्थित भाजप पक्षश्रेष्ठींनी महापालिका निवडणुकीपुर्वी भाजप अंतर्गत बंड थंड केले. त्यामुळे अकोल्यात भाजप प्रणित शहर सुधार आघाडीची सत्ता आली. जर हे बंड कायम राहिले असते तर मात्र भाजपला मोठा फटका बसला असता. या बंडात हरिश आलिमचंदानी यांच्यासोबत असलेले ॲड.गिरिश गोखले यांना पक्षाने स्विकृतचे वचन दिले होते. ते वचन आज भाजपने पुर्ण केल्याचे चित्र आहे. माजी नगरसेवक असलेले ॲड.गिरिश गोखले हे भाजपाचे भविष्यातील आश्वासक चेहरा म्हणून समोर येत आहे. नगर रचना, टाऊन प्लॅनिंग आणि सामाजिक क्षेत्रात त्यांचे योगदान मोठे आहे. न्यू ईरा शाळेचे ते पदाधिकारी असून जठारपेठेतील स्वराज्य मंडळाचे ते संस्थापक आहे. मोठा तरुण वर्ग ॲड.गिरिश गोखले यांच्यासोबत जुळला आहे.

# राष्ट्रवादीचे अविनाश मार्डीकर स्थायी समिती सभापती



प्रतिनिधी ६ मार्च

**अमरावती:** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आमदार संजय खोडके व आमदार सुलभा खोडके यांचे निकटवर्तीय मानले जाणारे ज्येष्ठ नगरसेवक अविनाश मार्डीकर यांची स्थायी समिती सभापतीपदी निवड झाली.

काँग्रेसचे नगरसेवक प्रशांत महल्ले यांना मात दिली.

तर एमआयएमचे नगरसेवक तटस्थ राहिले. महानगरपालिकेत स्थायी समिती सदस्यांची संख्या १६ आहे. महापौरपद भाजपाला, उपमहापौरपद युवा स्वाभिमान पक्षाला मिळाल्याने सत्तेत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नगरसेवकाला स्थायी समिती सभापतीपद देण्यासंदर्भात फार्मूला आधीच ठरला होता.

# प्रतिष्ठित बिल्डर सुनील इन्नानी यांच्या गळ्यात स्वीकृत नगरसेवक पदाची माळ

प्रतिनिधी ६ मार्च

**अकोला:** अकोला महानगरपालिकेच्या स्वीकृत नगरसेवक पदासाठी वंचित बहुजन आघाडीकडून अनेक नावांची चर्चा सुरू असतानाच, ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सर्वांना धक्का देत एका 'बॅकरूम' नावाला पसंती दिली आहे.

अकोल्यातील प्रसिद्ध उद्योजक आणि 'नरेडको'चे संस्थापक अध्यक्ष सुनील इन्नानी यांचे नाव निश्चित करण्यात आले असून, वंचितने या निवडीद्वारे शहराच्या विकासाचे आणि सामाजिक संतुलनाचे नवे समीकरण मांडले आहे. इतकेच नाही तर अकोल्याच्या टाउन प्लॅनिंग विस्तारात त्यांची भूमिका आणि योगदान महत्वाचे राहणार आहे.सुनील इन्नानी यांच्या निवडीमुळे अकोल्याच्या नागरी प्रश्नांना तांत्रिक आणि व्यावसायिक दृष्टीकोनातून न्याय मिळेल, असा विश्वास वंचितच्या गोटातून व्यक्त होत आहे.सुनील इन्नानी हे केवळ एक नाव नसून अकोल्याच्या रिअल इस्टेट क्षेत्रातील एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व आहे. बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर सारख्या छोट्या गावातून अकोल्यात स्थायिक होऊन त्यांनी आपले साम्राज्य उभे केले.त्यांनी 'मार्वल ट्रिनिटी रिअल इस्टेट एलएलपी' या संस्थेची स्थापना केली. अकोल्यातील आधुनिक वास्तुकलेचा नमुना असलेले यमुना आर्केड, यमुना बिझनेस पार्क, यमुना टॉवर-१ व २, त्रिमूर्ती टॉवर आणि लँडमार्क बिल्डिंगचे ते निर्माते आहेत. बांधकाम क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील 'नरेडको' या संघटनेच्या अकोला युनिटचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत.



## वंचितची नवी रणनीती

ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सुनील इन्नानी यांची निवड करून केवळ एका उद्योजकाला संधी दिली नाही, तर अकोल्यातील व्यापारी आणि मध्यमवर्गीय वर्गाला पक्षाशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे. माहेश्वरी मसाजाला साद घालण्याचा प्रयत्न केला गेला आहे. सामाजिक समीकरणांची अचूक गुंफण करत वंचितने विकासाचा 'चेहरा' समोर आणला आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.स्वीकृत पदासाठी अनेक कट्टर कार्यकर्त्यांची नावे चर्चेत होती, मात्र इन्नानी यांचे नाव समोर आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. प्रशासकीय कामाचा अनुभव आणि शहराच्या पायाभूत सुविधांची जाण असलेले व्यक्तिमत्व सभागृहात पाठवून वंचितने आपली पकड मजबूत केली आहे.


CLASSIFIED

प्लॉट प्लॉट प्लॉट

नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट

पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8263923606 7757905649

फ्लॅट फ्लॅट फ्लॅट

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट

पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8468872250 8788432278


# सिस्टम झुकले, सत्याचा विजय !

## 9 वर्षांच्या कायदेशीर लढाईनंतर कंत्राटदाराला ऐतिहासिक न्याय

प्रतिनिधी ६ मार्च

**अकोला:** अकोला महानगरपालिकेविरुद्ध तब्बल ९ वर्षे चाललेल्या एका कायदेशीर लढाईत अखेर कंत्राटदाराचा विजय झाला आहे. अकोला मनपाने अडवून ठेवलेले ५,९७,९४७/- रुपयांचे देयक व्याजासह देण्याचे आदेश न्यायालयाने दिले असून, या निर्णयाने संपूर्ण महाराष्ट्रातील कंत्राटदारांमध्ये न्यायाची नवी आशा निर्माण केली आहे.

कंत्राटदार शोएब सोराठिया यांनी अकोला महानगरपालिकेची कंत्राटी कामे पूर्ण केली होती. मोजमाप पुस्तिकेत कामाची नोंद झाली होती आणि बिलेही मंजूर झाली होती. तरीही, मनपा प्रशासनाने देयक अदा करण्यास नकार दिला. इतकेच नाही तर, संबंधित कंत्राटदाराला 'ब्लॅकलिस्ट' करून त्यांच्यावर पोलीस तक्रारही दाखल केली होती. अन्यायाविरुद्ध सोराठिया यांनी अकोल्याच्या दिवाणी न्यायालयात धाव घेतली. या प्रकरणात ॲडव्होकेट तौसीफ नियाजी यांनी कंत्राटदाराची बाजू मांडली. न्यायालयाने स्पष्ट केले की काम पूर्ण झाले असताना देयक रोखणे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. मूळ रकमेवर ६ टक्के वार्षिक व्याजासह देयक अदा करण्याचे आदेश दिले. मनपाने या निर्णयाला सत्र न्यायालय आणि उच्च न्यायालयात आव्हान दिले होते, मात्र दोन्ही ठिकाणी मनपाचे अपील फेटाळण्यात आले. अखेर प्रशासनाला ८,१५,४२४/- रुपये कंत्राटदाराला अदा करावे लागले. या केस मध्ये विजयाचे श्रेय ॲड. तौसीफ नियाजी यांच्या अभ्यासपूर्ण युक्तिवादाला आणि भक्कम पुराव्यांना दिले जात आहे. त्यांना या कामात ॲड. मोहसीन आणि ॲड. चेतन दुबे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश शहीद

प्रतिनिधी ६ मार्च

**भंडारा :** आसाममधील कार्बी आंगलोंग भागात प्रशिक्षणादरम्यान रडारवरून गायब झालेले भारतीय हवाई दलाचे सुखोई एसयू-३० एमकेआय लढाऊ विमान कोसळले. या अपघातात दोन्ही वैमानिक, स्क्वॉड्रन लीडर अनुज आणि फ्लाइट लेफ्टनंट महाराष्ट्राचे सुपूत्र पूर्वेश दुरगकर यांना वीरमरण आले. पूर्वेश दुरगकर भंडारा जिल्ह्यातील आहेत.

# इराणने माझं विमान पाडण्याचा इशारा दिला होता

## एकनाथ शिंदेंनी कबुली दिल्याचा रोहित पवारांचा दावा

प्रतिनिधी ६ मार्च

**मुंबई :** एकनाथ शिंदे हे २०२३ साली दावोसला जात असताना इराण आणि इराकच्या लष्कराने त्यांचे विमान पाडण्याचा इशारा दिल्याचा खळबळजनक गौप्यस्फोट आमदार रोहित पवार यांनी अलीकडेच केला होता. एकनाथ शिंदे यांनी हा दावा खरा असल्याचे सांगत या गोष्टीला दुजोरा दिल्याचा दावा रोहित पवार यांनी केला.

मी एकनाथ शिंदे यांना भेटलो तेव्हा त्यांनी अशी घटना घडल्याचे मान्य केले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना दावोसला जाताना इराक आणि इराणच्या बॉर्डरवर विमानाने हवाई उड्डाणची परवानगी न घेतल्यामुळे विमान पाडण्याचा इशारा दोन्ही देशांनी दिला होता.

१६ ते २० जानेवारी २०२३ दरम्यान एकनाथ शिंदे साहेब दावोसला गेले होते.


CMYK CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अमरावती जिल्ह्यातील पशुधन विकास अधिकाऱ्यांची रिक्त पदे कधी भरणार - आ.संजय खोडके

**अमरावती :** राज्यविधीमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशशनामध्ये विधानपरिषदेतील कामकाजादरम्यान महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा संदर्भात प्रशोत्तराच्या तासांमध्ये आ.संजय खोडके यांनी अमरावती जिल्ह्यातील पशु विकास अधिकाऱ्यांरी रिक्त पदे कधी भरणार असा प्रश्न उपस्थित केला. यावर राज्यात एमपीएससी मार्फत पशुसंवर्धन विभागात २,७९५ पदांसाठी महाभरती लवकरच होणार असल्याचे उत्तर राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी सभागृहात दिले.




राज्यविधिमंडळाच्या विधानपरिषदेच्या सभागृहात बोलत असतांना आ.संजय खोडके यांनी सांगितले कि, अमरावती जिल्ह्यातील पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या पुनर्ररचनेनुसार जिल्ह्यात १५८ पदे मंजूर आहेत. आणि १५८ पदांपैकी केवळ ४८ पदे भरलेली आहेत. म्हणजेच ११० पशुधन विकास अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. एकट्या अचलपूर तालुक्यात पशुधन विकास अधिकाऱ्यांची २० ते २२ पदे रिक्त आहेत. तसेच सहाय्यक आयुक्तांची जवळपास ३१ पदे मंजूर असून त्यातील १६ पदे भरलेली आहेत, तर १५ पदे रिक्त आहेत . शासनाच्या वतीने महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा अंतर्गत २,७९५ पदांची महाभरती संदर्भात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. तर ३०८ पदे सहाय्यक आयुक्त अ वर्ग पदाचे सुद्धा भरती घेण्याचे सांगण्यात आले आहे.

परंतु संपूर्ण पदभरतीच्या प्रक्रियेला अजून एकवर्षाचा कालावधी लागणार आहे. अशा परिस्थितीमध्ये अमरावती जिल्ह्यातील पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांच्या संदर्भात योग्य कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यासाठी संपूर्ण राज्यात ज्या जिल्ह्यांमध्ये पशुधन विकास अधिकाऱ्यांची जास्त पदे आहे. व काही जिल्ह्यांमध्ये कमी पदे आहेत. त्यामध्ये फेररचना करणार का ? असा प्रश्न आमदार संजय खोडके यांनी उपस्थित केला.

यावर उत्तर देतांना राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी सभागृहात सांगितले कि, राज्यात पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या पदभरतीसंदर्भात वर्ष २०२४ मध्ये आकृतीबंध तयार करण्यात आला असून पदांच्या काही संवर्गामध्ये वाढ झाली आहे. या संदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करून २५ एप्रिल २०२५ रोजी पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा, गट अ ची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. तसेच १२ ऑगस्ट २०२५ रोजी ३०८ सहाय्यक आयुक्त पदाची सुद्धा जाहिरात काढली आहे. तसेच पेपर सेट करण्यासाठी काही प्रोफेसरची निवड करावी लागत असल्याचे एमपीएससी मार्फत कळविण्यात आल्याने गेल्या २५ ऑक्टोबर पर्यंत याबाबतची पूर्तता देखील करण्यात आली असल्याने त्यामुळे आगामी अधिवेशनापर्यंत यातील बऱ्याच गोष्टी मार्गी लागणार असल्याचे उत्तर मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिले. तसेच पशु पर्यवेक्षकांची पदे जिल्हा परिषदेने भरण्याची असल्याने याबाबत सुद्धा सामान्य प्रशासन विभागासोबत बोलणे झाले असल्याचे ना. पंकजाताई मुंडे यांनी सभागृहात उत्तर दिले.

# अमरावती शहरात वाहतूक नियमांमध्ये अंशतः बदल

## पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन

प्रतिनिधी ६ मार्च

**अमरावती :** अमरावती शहरात चित्रा चौक ते नागपूरी गेट उड्डाणपुलाचे उर्वरित बांधकाम नियोजनबध्द पध्दतीने पुर्ण करण्यासाठी दि. १८ मार्च २०२६ पर्यंत वाहतूक नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. यासाठी पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी अधिसूचना जारी केली आहे.

सर्व वाहनांना वाहतूकीसाठी बंद करण्यात येणारे मार्ग

टांगा पडाव ते नागपूरी गेट चौक पर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी पादचारीसह. चित्रा चौक ते नागपूरी गेट सर्व प्रकारचे जड व हलके मालवाहु तसेच बसेस इत्यादी वाहनांना प्रवेश बंदी राहील.

वाहतूकीस पर्यायी मार्ग

टांगा पडाव-जवाहर गेट-सक्करसाथ-नागपूरी गेट. दीपक चौक-चौधरी चौक-आदर्श हॉटेल-पिंजारा मस्जिद मार्गे नागपूरी गेट. फक्त दुचाकी, कार, ऑटोसाठी प्रवेश सुरु राहील. इतर सर्व जड वाहनांना प्रवेशबंदी राहील.वाहतूक परिस्थितीनुसार वाहतूक थांबविणे व वळविणे याबाबत सर्व अधिकार वाहतूक विभागास राहील. तसेच अत्यावश्यक वेळी जनहित लक्षात घेता सहायक पोलीस आयुक्त वाहतुक अमरावती शहर यांना कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून नियोजित अधिसूचनेमध्ये वाहतूकीच्या नियमनाबाबत अंशतः बदल करण्याचे अधिकार राहील. या अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालक, वाहनधारकांवर मोटर वाहन अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी या कालावधीत सहकार्य करावे आणि वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ९ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर चित्रा चौक उड्डाणपुलाच्या कामाला वेग

प्रतिनिधी ६ मार्च

**अमरावती :** गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले चित्रा चौक उड्डाणपुलाचे काम अखेर पुन्हा सुरू झाले असून आता या कामाला वेग देण्यात आला आहे. तब्बल ९ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर या उड्डाणपुलाच्या बांधकामाला गती मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

चित्रा चौक हा शहरातील अतिशय वर्दळीचा भाग असून येथे नेहमीच मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे या ठिकाणी उड्डाणपुलाची मागणी अनेक वर्षांपासून केली जात होती. २०१७ पासून या उड्डाणपुलाचे काम विविध कारणांमुळे रखडले होते. त्यामुळे नागरिकांसह व्यापाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, या उड्डाणपुलाचा विषय सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात चर्चेत आला होता. माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी या प्रकरणावर आक्षेप घेतल्यानंतर हा विषय अधिक चर्चेत आला. तसेच या संदर्भात न्यायालयात याचिका दाखल झाल्यानंतर प्रशासनाकडून या कामाकडे गांभीर्याने लक्ष देण्यात आले.

# हरभरा (चना) हमीभाव खरेदीसाठी नोंदणी सुरूः

## शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

प्रतिनिधी ६ मार्च

**अमरावती:** केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये हरभरा (चना) खरेदीसाठी नाफेड व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने अमरावती विभागातील मंजूर केंद्रांवर खरेदी प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यावर्षी हरभरा पिकासाठी केंद्र शासनाने ५ हजार ८७५ रुपये प्रति क्विंटल असा किमान आधारभूत दर निश्चित केला आहे.



योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतक-यांनी संबंधित खरेदी केंद्रावर खालील कागदपत्रांसह नोंदणी करणे अनिवार्य आहे. चालू हंगामातील हरभरा पिकांची नोंद असलेला डिजिटल ७/१२ उतारा, आधार कार्डची छायांकित प्रत, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत किवा कॅन्सल चेक (ज्यामध्ये IFSC कोड स्पष्ट दिसेल), आधार लिंक असलेला मोबाईल क्रमांक.शेतक-यांनी आपला शेतमाल खरेदी केंद्रावर आणण्यापूर्वी तो स्वच्छ, वाळलेला आणि एफएक्यू दर्जाचा असावा याची खात्री करावी. ऑनलाइन नोंदणीनंतर शेतकऱ्यांना त्यांच्या मोबाईलवर एसएमएस प्राप्त होईल, त्यानंतरच माल केंद्रावर आणावा. कोणत्याही अफवांना बळी न पडता अधिकृत खरेदी केंद्रावरच आपली नोंदणी करावी. अमरावती विभागातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी हरभरा खरेदी केंद्रांवर जाऊन आपली नोंदणी करावी आणि हमीभाव योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयामार्फत करण्यात येत आहे.

# नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा ) अमरावती यांच्या वतीने आयोजित भव्य सांस्कृतिक महोत्सव

प्रतिनिधी ६ मार्च

**अमरावती :** 'ब्लॉसम २०२६' हा कार्यक्रम रविवार दिनांक १ मार्च २०२६ रोजी सिपना कॉलेज ऑफ इंजिनीरिंग अँड टेकनॉलॉजि , बडनेरा रोड, अमरावती येथील ऑडिटोरियम मध्ये मोठ्या उत्साहात पार पडला.




कार्यक्रमाचे उद्घाटन अमरावती महानगरपालिकेचे नगरसेवक डॉ. राजेंद्र तायडे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दिनेश गवळी(माजी अध्यक्ष श्ण्घ्ष्ट मुंबई),डॉ. राम खरबडे (चेअरमन),डॉ प्रवीण औगड, डॉ पंकज कावरे, डॉ. विजय अजमिरे (जॉईंट सेक्रेटरी निमा ऑल इंडिया ), डॉ. कमल राऊत (Coordinator NIMA All India), डॉ. राजेश उताणे (माजी श्ण्घ्ष्ट सदस्य), डॉ. अनिल बाजारे (माजी सचिव ऱ्र्ष्ट महाराष्ट्र), डॉ. अनिल जावरकर, डॉ. आशिष येवतीकर, डॉ. प्रिया चौधरी, डॉ. प्रेमा चौधरी, डॉ. रुपाली कावरे, डॉ. स्वाती टोंगळे, डॉ. अमोल ठवळी, डॉ. उन्मेश डालके, डॉ. आकाश चांगोले, डॉ. राधा नाईक, डॉ. विजय खंडारे, डॉ. सागर सांबे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये माजिजाऊ – डॉ. प्रांजली उमप, छत्रपती शिवाजी महाराज – डॉ. वैभव ढवळे, सईबाई – डॉ. शिल्पा ढवळे यांनी साकारलेली भूमिका विशेष आकर्षण ठरली. स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांना यावेळी मानाचा मुजरा अर्पण करण्यात आला.या कार्यक्रमात डॉ. राजेंद्र तायडे, डॉ. रविंद्र बारसकर आणि डॉ. प्रवीण मोहोड यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे विद्यार्थी कु वसुंधरा शरयू वानखडे, श्रीधन तुषार पोहनकर, मानद हर्षवर्धन नवले , अद्विक उज्ज्वल बारंगे, कु रिया राहुल भटकर,कु शर्वरी प्रवीण मोहोड – यांचा गौरव करण्यात आला.

यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये किड्स डान्स, महिलांचे नृत्य, कपल डान्स, पुरुषांचे नृत्य, स्किट, नाटिका, फॅशन शो, फिश पाँड तसेच ऑर्केस्ट्रा या कार्यक्रमांचा समावेश होता. कार्यक्रमाचा समारोप सर्वांसाठी आयोजित करण्यात आलेल्या स्नेहभोजनाने झाला. BLOSSOM २०२६ कार्यक्रमाचे आयोजन डॉ. राम खरबडे (चेअरमन) यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. सह-अध्यक्ष म्हणून डॉ. प्रेमा चौधरी, डॉ. वैभव ढवळे, डॉ. अमोल ठवळी तसेच आयोजन समितीतील सर्व सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

## अमरावतीमध्ये हनुमान गढी धार्मिक पर्यटन केंद्राची उत्कृष्ट निर्मिती करावी-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



प्रतिनिधी ६ मार्च

**अमरावती :** अमरावती शहरालगत हनुमान गढी परिसर पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यात येत आहे. या प्रस्तावित हनुमान गढी परिसर पर्यटन विकासासाठी १२१ कोटींच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवन येथे आयोजित शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. अमरावती शहरालगत असलेल्या हनुमान गढी परिसरात पर्यटकांच्या सुविधांची कामे आधी पूर्ण करावी.

# अमरावतीत खंडेलवाल ज्वेलर्सचे ७ ते ९ मार्चदरम्यान भव्य दागिने प्रदर्शन

प्रतिनिधी ६ मार्च

**अमरावती :** शंभर वर्षांची उज्ज्वल परंपरा आणि सहा पिढ्यांचा विश्वास लाभलेले खंडेलवाल ज्वेलर्स अकोला प्रायव्हेट लिमिटेड पुन्हा एकदा अमरावती जिल्ह्यातील ग्राहकांच्या सेवेत दाखल होत आहेत. दिनांक ७, ८ व ९ मार्च रोजी अमरावती येथे भव्य दागिने प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.



सामान्यतः कोणताही व्यवसाय तीन पिढ्यांपलीकडे टिकणे कठीण मानले जाते. मात्र खंडेलवाल ज्वेलर्सने सहा पिढ्यांचा यशस्वी प्रवास पूर्ण करत प्रामाणिकपणा, पारदर्शक व्यवहार आणि ग्राहकांचा विश्वास जपला आहे. हाच त्यांचा वारसा आजही त्यांची मोठी ताकद मानली जाते.

सध्या अकोला येथे दोन भव्य शोरूम्स असून वरुड (जि. अमरावती), वाशीम आणि बुलढाणा येथेही ग्राहकांचा चांगला विश्वास मिळाला आहे. तसेच मराठवाड्यातील जालना येथूनही नव्या पर्वाची सुरुवात करण्यात आली आहे.

या प्रदर्शनात रोज गोल्ड व व्हाईट गोल्ड ज्वेलरी, नॅचरल डायमंड व लॅब ग्रोन डायमंड, रुबी, पन्ना, मोती, कुंदन, पोलकी, टेम्पल ज्वेलरी, गेरू ज्वेलरी तसेच पारंपरिक महाराष्ट्रीयन दागिने यांचे आकर्षक कलेक्शन उपलब्ध राहणार आहे. तसेच लाईटवेट आणि वाजवी दरातील दागिन्यांचेही विशेष कलेक्शन ग्राहकांसाठी ठेवण्यात आले आहे.

प्रत्येक दागिन्यात स्टोन आणि वजनाची संपूर्ण पारदर्शक कपात केली जाते. प्रदर्शनात डायमंड ज्वेलरीवर मजुरीत ५० टक्क्यांपर्यंत सूट तर गोल्ड ज्वेलरीवर मजुरीत २५ टक्क्यांपर्यंत विशेष ऑफर देण्यात येणार आहे.

सोन्याच्या दरातील चढ-उतार लक्षात घेऊन 'चीत भी आपकी, पट भी आपकी गोल्ड रेट भी आपका' या संकल्पनेतून विशेष गोल्ड रेट योजना सादर करण्यात आली आहे. यामध्ये आजच्या दरात बुकिंग करून ३१ डिसेंबरपर्यंत किंमत सुरक्षित ठेवण्याची सुविधा तसेच एघ्ङ पद्धतीने गुंतवणूक करून सरासरी दराचा लाभ घेता येणार आहे. सुवर्ण गुंतवणुकीबाबत तज्ज्ञ मार्गदर्शनही ग्राहकांना मिळणार आहे.

खंडेलवाल ज्वेलर्स सामाजिक क्षेत्रातही सक्रिय असून गोरक्षण, शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, मंदिरे आणि विविध सामाजिक संस्थांशी त्यांचा सहभाग आहे. तसेच कर्मचारी वर्गाला इझ, 'एंघ्ण यांसारख्या सुविधा आणि त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शालेय साहित्य सहाय्य दिले जाते.

सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

# ५० हजार घेऊन बनावट नोटांचे बंडल देत तरुणाची फसवणूक

## व्हॉट्सअपवरून संपर्क; पारखेड फाट्यावर व्यवहार

प्रतिनिधी ६ मार्च

**खामगाव :** ५० हजार रुपायांच्या बदल्यात पाच लाख रुपये देण्याचे आमिष दाखवून ५० हजार रुपये उकळत बनावट नोटांचे बंडल देऊन एका तरुणाची फसवणूक केल्याची घटना तालुक्यातील पारखेड फाटा येथे घडली.

गणेश रवींद्र सोनवणे (२४, रा. गोकुळवाडी, औरंगपुरा, ज्योतिबा फुले चौक, छत्रपती संभाजीनगर) यांनी याबाबत तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार, आरोपींनी दोन मोबाइल क्रमांकांवरून त्यांच्याशी व्हॉट्सअपद्वारे संपर्क साधला. ५० हजार रुपये दिल्यास पाच लाख रुपये देतो, असे आमिष दाखवत त्यांना व्यवहारासाठी बोलावण्यात आले. फिर्यादीने आरोपींना ५० रुपये हजार दिल्यानंतर आरोपींनी त्यांना 'बच्चों की बँक' असे लिहिलेल्या, ५०० रुपयांच्या नोटांसारखे दिसणाऱ्या एकूण पाच लाख रुपयांच्या बनावट नोटांचे बंडल दिले.बनावट नोटांचे बंडल दिल्यानंतर आरोपी मोटारसायकलवरून पसार झाले. या प्रकरणी ५ मार्च रोजी पहाटे ५:४२ वाजता अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८, ३१८(४) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास साहाय्यक पोलिस निरीक्षक रवी मुंडे करीत आहेत.

## वझर येथे शाब्दिक वादातून दोघांमध्ये हाणामारी; गुन्हा दाखल

प्रतिनिधी ६ मार्च

**खामगाव :** तालुक्यातील वझर येथे क्षुल्लक कारणावरून दोनजणांमध्ये झालेल्या हाणामारीप्रकरणी हिवरखेड पोलिसात परस्परविरोधी तक्रारी दाखल करण्यात आल्या. याप्रकरणी पोलिसांनी गुरुवारी दोघांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, होळीच्या दिवशी वझर येथील तुकाराम धर्मदास पडताळ आणि गावातीलच प्रकाश बचनसिंग बटवाडे यांच्यात वाद झाला. तुकाराम पडवाळ यांच्या तक्रारी नुसार, ते दलीचंद टाकळा यांच्या घरासमोर बसले होते.त्यावेळे प्रकाश बटवाडे यांनी वाद घातला तसेच मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.प्रकाश बटवाडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, तुकाराम पडवाळ यांनी शिवीगाळ करत लोटपोट करून मारहाण केली, तर तुकाराम पडवाळ यांनीही बटवाडे प्रकाश यांनी वीट मारून जखमी केल्याचा आरोप केला आहे. तक्रारीवरून दोघांविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास हिवरखेड पोलिस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# शिवसेना आक्रमक! अवैध बायोडीझेल आणि निवासी क्षेत्रातील पेट्रोल पंपाविरोधात रणशिंग

प्रतिनिधी ६ मार्च

**खामगाव :** खामगाव व नांदुरा तालुक्यातील सामान्य जनतेच्या जिवाशी खेळणाऱ्या अवैध धंद्यांविरुद्ध आता शिवसेना आक्रमक झाली आहे. विनापरवाना सुरू असलेले जीवघेणे बायोडीझेल पंप आणि निवासी वस्तीत उभारला जाणारा पेट्रोल पंप या मुद्द्यांवरून शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र रामदास बघे यांनी थेट केंद्र सरकारकडे दाद मागितली असून प्रशासनाला कडक इशारा दिला आहे. राजेंद्र बघे यांनी केंद्रीय मंत्री मा.ना.प्रतापरावजी जाधव यांना दिलेल्या तक्रार अर्जात खळबळजनक आरोप केले आहेत. पिंप्राळा फाटा ता खामगाव आणि



वडनेर भोलजी ता नांदुरा या परिसरात कोणत्याही परवानगी शिवाय सर्रासपणे अवैध बायोडीझेल विक्री सुरू आहे.

यापूर्वी अशाच अवैध पंपांमुळे नायगाव फाट्यावर एका कामगाराचा मृत्यू झाला होता,तर वडनेर भोलजी येथे दोन जणांचा टाकीत पडून बळी गेला आहे. 'प्रशासन अजून किती बळींची वाट पाहत आहे?' असा संतप्त सवाल शिवसेनेने उपस्थित केला आहे.

खामगाव शहरातील जमजम कॉलनी (चिखली रोड) या दाट लोकवस्तीच्या भागात सर्व्हे नं. ४२/३ मध्ये पेट्रोल पंपाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. स्थानिक जनतेचा या कामाला तीव्र विरोध असतानाही प्रशासनाने सकारात्मक अभिप्राय दिलाच कसा, हा संशोधनाचा विषय असल्याचे बघे यांनी पत्रात म्हटले आहे. हा पंप सुरू झाल्यास भविष्यात भीषण स्फोट होऊन निष्पाप रहिवाशांचा बळी जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सिटी न्यूज अकोला

शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# ग्रामीण पोलिसांची प्रतिबंधित गुटखा व अवैध पेट्रोल-डिझेल विक्री विरुद्ध कारवाई

प्रतिनिधी ६ मार्च

**अकोट :** ऑपरेशन प्रहार' मोहिमेअंतर्गत अकोट ग्रामीण पोलिसांनी प्रतिबंधित गुटखा तसेच अवैधरित्या पेट्रोल-डिझेल विक्री करणाऱ्या आरोपीवर कारवाई करत एकूण १८ हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.



पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. ५ मार्च २०२६ रोजी अकोट ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग सुरू असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, ग्राम अकोली जहागीर (ता. अकोट) येथील वासुदेव गोविंदराव मेहरे हा आपल्या गणेश किराणा दुकानात शासनाने प्रतिबंधित केलेल्या पानमसाला-गुटख्याची विक्री करीत आहे. मिळालेल्या खात्रीलायक माहितीनुसार पोलिसांनी पंच व पोलीस पथकासह दुकानावर छापा टाकून कायदेशीर झडती घेतली. झडतीदरम्यान दुकानातून विमल पानमसाला गुटखा ४९ सिलबंद पॅकेट (किंमत ७,३५० रुपये) तसेच न्-१ टॅबॅकोचे ४९ पॅकेट (किंमत १,४७० रुपये) असा एकूण ८,८२० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला. तसेच दुकानात ४० लिटर डिझेल (४,००० रुपये), २० लिटर डिझेल (२,००० रुपये) आणि ३५ लिटर पेट्रोल (३,५०० रुपये) अशा स्वरूपात ९,५०० रुपयांचे पेट्रोल-डिझेल साठवून अवैधरित्या विक्रीसाठी ठेवलेले आढळून आले. यासह एकूण १८,३२० रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३, २७४, २७५, १२३, तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ मधील संबंधित कलमे आणि जीवनावश्यक वस्तू अधिनियम कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वैभव तायडे करीत आहेत. सहाय्यक पोलीस अधीक्षक निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांच्या नेतृत्वात पार पडली. या कारवाईत पो.हे.कॉ. विठ्ठल चव्हाण, पो.हे.कॉ. मोहम्मद नौरंगाबादी, मपो.हे.कॉ. गीता भांगे, पो.कॉ. शैलेश जाधव, पो.कॉ. शुभम लुंगे तसेच चालक पो.कॉ. अमोल मस्के यांनी सहभाग घेतला.

# आरोग्य क्षेत्रात अचूक 'डेटा' अत्यावश्यक – जिल्हाधिकारी वर्षा मीना

♦ नियोजन भवनात परिचारिका, आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा



प्रतिनिधी ६ मार्च

**अकोला :** आरोग्य क्षेत्रात सांख्यिकीचे मोठे महत्व आहे. 'डेटा' अचूक नसेल तर विश्लेषणही सदोष होऊ शकते. धोरणे बनविण्यातही अडचणी येतात. रूग्णसेवेत नोंदी घेण्याची प्रक्रिया व अहवाल सादरीकरण बिनचूक असले पाहिजे. त्यामुळे यासंबंधीचे प्रशिक्षण परिचारिका व आरोग्य कर्मचा-यांना उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे व्यक्त केले. अमरावती येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय व सुश्रुषा सवर्ग ग्रुप यांच्या वतीने निरंतर परिचर्या शिक्षण कार्यक्रमांतर्गत 'रूग्णसेवेत प्रभावी रेकॉर्डिंग व रिपोर्टिंग' याविषयी प्रशिक्षण कार्यक्रम नियोजनभवनात झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. उपसंचालक डॉ. सुशील कुमार वाघचौरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आरती कुलवाल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राचार्य सरिता राठोड, वैद्यकीय अधीक्षक डॉ. राधा जोगी, श्री. जलील, सहायक अधिसेविका सुषमा कदम, अधिसेविका चंदा खोडके, माया चव्हाण, माला सुरपाम आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, परिचारिका, आरोग्य कर्मचा-यांकडून माहिती व सांख्यिकी अचूक भरली गेली नाही तर त्याचा सांख्यिकीय अहवालावर विपरित परिणाम होऊ शकतो. त्यामुळे विश्लेषणही चुकीचे होते, तसेच जिल्हा व राज्यस्तरावर धोरणे ठरविण्यात अडचणी निर्माण होतात. अचूक डेटा लोकोपयोगी निर्णयांसाठी उपयुक्त ठरत असतो. प्रशिक्षण शिबिरात परिचारिका व आरोग्य क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना रुग्णसेवेत योग्य नोंद व अहवाल यांचे महत्त्व व प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शासकीय, खासगी रूग्णालयांतील परिचारिका, आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पतंजली योग समिती अकोला व हिमाणी फाउंडेशन तर्फे योग शिबीर

प्रतिनिधी ६ मार्च

**अकोला :** पतंजली योग समिती व हिमाणी फाउंडेशन अकोला तर्फे ५ मार्च ते ९ मार्च पर्यंत एकात्मिक योग व प्राणायाम शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक खेतान नगरातील डी मार्ट समोरच्या गल्लीत स्वामी विवेकानंद शाळेच्या प्रांगणात सकाळी ६ ते ७:१५ या वेळेत शिबिर घेण्यात येईल. डॉ. सुहास काटे जिल्हा प्रभारी पतंजली योग समिती अकोला, डॉ. कपिल लाड जिल्हाध्यक्ष आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, डॉ. सुनिता कावळे, क्षितिजा वडी, कुलभूषण बोंमले, संजय लाड मार्गदर्शन करणार आहेत. नगरीतील महिला व पुरुषांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन पतंजली योग समिती व डॉ. अनिता भालतिलक सचिव हिमाणी फाउंडेशन यांनी केले आहे.

## हरभरा हमीभाव खरेदीसाठी नोंदणी सुरू

**अकोला :** केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये हरभरा खरेदीसाठी नाफेड व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने अमरावती विभागातील मंजूर केंद्रांवर खरेदी प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यावर्षी हरभरा पिकासाठी केंद्र शासनाने ५ हजार ८७५ रु. प्रति क्विंटल असा किमान आधारभूत दर निश्चित केला आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित खरेदी केंद्रावर चालू हंगामातील हरभरा पिकाची नोंद असलेला डिजिटल ७/१२ उतारा, आधार कार्डची छायांकित प्रत, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत किंवा कॅन्सल चेक (ज्यामध्ये घ्इएण कोड स्पष्ट दिसेल), आधार लिंक असलेला मोबाईल क्रमांक आदी कागदपत्रांसह नोंदणी करणे अनिवार्य शेतकऱ्यांनी आपला शेतमाल खरेदी केंद्रावर आणण्यापूर्वी तो स्वच्छ, वाळलेला आणि एफएक्यू (ईं) दर्जाचा असावा याची खात्री करावी. ऑनलाइन नोंदणीनंतर शेतकऱ्यांना त्यांच्या मोबाईलवर एसएमएस (एश्ए) प्राप्त होईल, त्यानंतरच माल केंद्रावर आणावा. कोणत्याही अफवांना बळी न पडता अधिकृत खरेदी केंद्रावरच आपली नोंदणी करावी. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी हरभरा खरेदी केंद्रांवर जाऊन आपली नोंदणी करावी आणि हमीभाव योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयामार्फत करण्यात येत आहे.

# शहरातील विविध भागांतील प्रश्न मार्गी लागणार का?

प्रतिनिधी ६ मार्च

**तेल्हारा :** शहरात सध्या विकासकामांच्या नावाखाली मोठ्या हालचाली सुरू झाल्याचे चित्र दिसत आहे. नगरपरिषदेच्या निवडणुकीनंतर नव्याने निवडून आलेले नगरसेवक आणि काही ठेकेदार यांच्यातील वाढती जवळीक शहरात चर्चेचा विषय ठरली आहे. विकासकामांसाठी निधी मंजूर होत असताना त्याच्या अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता कितपत राहील, याबाबत नागरिकांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शहरातील रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि स्ट्रीटलाईट यांसारख्या मूलभूत सुविधांचे प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. अनेक भागांत रस्त्यांची दुरवस्था झाली असून पावसाळ्यात चिखल आणि खड्ड्यांमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. काही भागांत नाल्यांची साफसफाई वेळेवर होत नसल्याने दुर्गंधी आणि आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत विकासकामांच्या नावाखाली मंजूर होणारा निधी नेमका कुठे आणि कसा वापरला जात आहे, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. स्थानिक पातळीवर काही ठेकेदारांना कामे देताना नियमांचे पालन केले जाते का, हा देखील महत्त्वाचा मुद्दा आहे. शहरात अशी चर्चा रंगत आहे की काही ठेकेदार आणि नव्याने निवडून आलेले नगरसेवक यांच्यातील जवळीक वाढत असून त्याचा परिणाम कामांच्या वाटपावर होत आहे. जर ही परिस्थिती कायम राहिली, तर दर्जेदार विकासकामे होण्याऐवजी केवळ कागदोपत्री कामे होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, नागरिकांनी नगरपरिषद प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी पारदर्शकता राखून विकासकामे करावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. शहरातील विविध भागांतील प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी ठोस नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणी गरजेची असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे. नगरसेवकांनी निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे ही आता त्यांची जबाबदारी आहे. शहरातील मूलभूत सुविधा सुधारण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न झाले, तर नागरिकांचा विश्वास पुन्हा जिंकता येईल. अन्यथा 'विकास' हा शब्द केवळ घोषणांपुरताच मर्यादित राहील, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत. आता खऱ्या अर्थाने प्रश्न असा आहे की तेल्हारा शहरातील प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी एकत्रितपणे काम करणार का, की ठेकेदार आणि राजकारणाच्या समीकरणांतच विकास अडकून राहणार?

## चोरी गेलेल्या गायींचा तपास करुन परत करा

प्रतिनिधी ६ मार्च

**शेतकऱ्याचे एसपी कार्यालयाला निवेदन**

**हिवरखेड:** पोलिस स्टेशन अंतर्गत तळेगाव बाजार, आकोली रुपराव, काळेगाव ,सौदंळा, हिंगनी येथील गाय बैल चोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. पोलिसांनी तपास करुन गायी परत कराव्या अशी मागणी काळेगाव येथील शेतक-याने एसपींना निवेदनाद्वारे मागणी केली आहे. काळेगाव येथील शेतकरी पुरुषोत्तम मगंळे यांच्या गीर जातीच्या दोन गाई गोठ्यातुन चोरुन नेल्या. जवळपास एक लाख रुपये किंमतीच्या गाई होत्या. माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह गाईच्या दुधावर चालतो. गाय चोरी गेल्याने आता कुटुंब चालवावे कसे असा प्रश्न पडला आहे. माझ्या गायवाड्यातुन चोरी गेलेल्या गायी मला परत मिळाव्या असे निवेदन पुरुषोत्तम मगंळे यांनी दिले आहे.

# सेंट पॉल्स अकॅडमी मध्ये व्हाईट कलर डे साजरा

वि प्रतिनिधी ६ मार्च

**अकोट :** स्थानिक सेंट पॉल्स अकॅडमी येथे ५ मार्च रोजी व्हाईट कलर डे साजरा करण्यात आला.




कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया ,उपाध्यक्ष लूणकरन डागा, सचिव प्रमोद चांडक, दिपम लखोटिया, शारदा लखोटिया, सुधा डागा, रेखा चांडक, अवनी लखोटिया शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे , उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल तसेच , शाळेचे व्यवस्थापक प्रभुदास नाथे , एडमिन सचिन सुपळकर, तसेच पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, मालती महाले, सारिका रेळे ,वैशाली गावत्रे, यांची मंचावर उपस्थिती लाभली. या कार्यक्रमात नर्सरी ते सिनियर केजी पर्यंत सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमात सर्वप्रथम विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी व्हाईट कलरचा ड्रेसअप होता. आणि टिफिन मध्ये व्हाईट कलर चे फूड किंवा फ्रुट आणले होते. नर्सरीच्या विद्यार्थ्यांनी व्हाईट डे निमित्त नृत्य सादर केले. व सिनियर केजी च्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले . तसेच नर्सरी ते सिनियर केजी च्या विद्यार्थ्यांसाठी फॅन्सी ड्रेस कॉम्पिटिशन घेण्यात आली होती. व्हाईट कलरच्या संबंधित वस्तू , विद्यार्थ्यांनी आपली वेशभूषा करून आपले डायलॉग म्हटले. जसे इडली, मून, बटरफ्लाय, डक अशा वेगवेगळ्या वेशभूषा केल्या होत्या. व त्यांना पर्यवेक्षक म्हणून पूजा राऊत ह्या होत्या. कार्यक्रमाचे सूत्र संचालन रश्मी बेराड तसेच आभार प्रदर्शन अश्विनी आवंडकार यांनी केले.

# शक्तिधाम मंदिरात 15 मार्च रोजी 'विराट हिंदू सम्मेलन'

प्रतिनिधी ६ मार्च

**अकोला :** शहरातील गीता नगर येथील श्री शक्तिधाम मंदिरात रविवारी १५ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता 'विराट हिंदू सम्मेलन' आयोजित करण्यात आले आहे. हिंदू जागरणाला नवी ऊर्जा व चेतना देणे तसेच सनातन संस्कृती, धर्म आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. देशभरात अशा प्रकारच्या हिंदू सम्मेलनांमधून समाजात एकजुटीचा संदेश देण्यावर भर दिला जात असल्याचे आयोजकांचा वतिने सांगण्यात आले आहे.

या कार्यक्रमापूर्वी रविवारी सायंकाळी ५ वाजता कलश यात्रा काढण्यात येणार आहे. ही यात्रा श्री शिवशंकर मंदिर येथून सुरू होऊन शक्तिधाम मंदिर, गीता नगर येथे समाप्त होईल. कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून श्री निलेशजी जोशी मार्गदर्शन करणार आहेत. तसेच श्री हभप.ज्ञानेश्वर महाराज वाघ यांचे आशीर्वचन लाभणार आहे. महिला वक्त्या म्हणून सौ. कांचन गोखुल हरणे या उपस्थितांना संबोधित करणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन सकल हिंदू समाज – गीता नगर, गंगानगर, अकोली, हिंगणा व सोमठाणा परिसरातील नागरिकांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर भाविकांसाठी महाप्रसाद (फराळ) व्यवस्था करण्यात आली आहे. आयोजकांनी शहरातील सर्व हिंदू बांधवांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे.

## बसस्थानक ते पत्रकार कॉलनी रस्ता मोकळा



प्रतिनिधी ६ मार्च

**अकोला :** मध्यवर्ती बसस्थानक ते पत्रकार कॉलनी मार्गावरील अतिक्रमणामुळे अरुंद झालेला रस्ता अखेर मोकळा झालेला दिसत आहे. बसस्थानक प्रशासनाने कुंपण भिंत उभारल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

महसुल कॉलनी, पत्रकार कॉलनी, सिव्हील लाईनकडे जाणाऱ्या वाहतुकदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. या भागात रहदारी मोठ्या प्रमाणात आहे. परंतु ऑटोरिक्षा, लक्झरी बसेस या ठिकाणी उभ्या राहतात. त्यामुळे येण्या जाण्यात अडथळा येत होता. काही दिवसांपासून पूर्वीची गजबज कमी झालेली दिसते. मात्र यापुढे अशीच स्थिती राहावी याकडे लक्ष दिले जावे अशी मागणी केली जात आहे.

## आरोग्य विभागाच्या महिला अधिकाऱ्याची पोलिसांकडे धाव

प्रतिनिधी ६ मार्च

**अकोला :** उपसंचालक कार्यालयातील मुख्य प्रशासकीय अधिकारी सुनिता खडसे यांनी आपल्या जीविताला धोका असल्याची लेखी तक्रार रामदासपेठ पोलीस ठाण्यात दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रमोद देंगे हे जिल्हा स्त्री रुग्णालय येथे सहायक अधीक्षक पदावर कार्यरत असताना त्याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. कारवाईमुळे सध्या ते ग्रामीण रुग्णालय, लोही (जि. यवतमाळ) येथे कार्यरत आहेत. निलंबन व वेतन थकबाकीच्या कारणावरून त्यांनी ४ मार्च रोजी खडसे यांच्या दालनात आत्मदहन करण्याबाबतचे पत्र कार्यालयात दिले. श्रीमती खडसे यांनी स्पष्ट केले की संबंधित कारवाई उपसंचालक यांच्या आदेशानुसार चौकशी समितीद्वारे पारदर्शक पद्धतीने करण्यात आली. आपल्याला जबाबदार धरणे अयोग्य आहे असे म्हटले आहे.

# मध्य रेल्वे प्रशासनाने ५९० विना तिकीट प्रवास करणाऱ्यांना पकडले

प्रतिनिधी ६ मार्च

**अकोला :** मध्य रेल्वे प्रशासनाकडून विनातिकीट प्रवास करणाऱ्यांविरुद्ध मोठी कारवाई करण्यात आली आहे. तसेच, विनाकारण अलार्म चेन ओढणाऱ्यांवरही कठोर पावले उचलली गेली आहेत. अकोल्यात मध्य रेल्वे प्रशासनातर्फे २५ फेब्रुवारीपासून विशेष तिकीट तपासणी अभियान राबवण्यात आले. या मोहिमेदरम्यान विनातिकीट किंवा चुकीच्या तिकिटासह प्रवास करणाऱ्या एकूण ५९० प्रवाशांना पकडण्यात आले. या सर्व प्रवाशांवर कारवाई करत रेल्वे प्रशासनाने ३ लाख ७२ हजार ५४५ रुपये दंड वसूल केला. कलम १४५ अन्वये कारवाई: रेल्वे कायद्याच्या कलम १४५ अंतर्गत ९ प्रकरणांमध्ये संबंधितांकडून ११०० रुपये अतिरिक्त दंड आकारण्यात आला. रेल्वे सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रवासादरम्यान विनाकारण अलार्म चेन ओढणाऱ्यांवरही जरब बसवली जात आहे. डिसेंबर २०२५ ते २४ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत अशा प्रकारची एकूण ४९५ प्रकरणे समोर आली आहेत. त्यापैकी ४२६ प्रकरणांत कारवाई करून १ लाख ४३ हजार २०० रुपये दंड वसूल करण्यात आला. स्थानक परिसरात बेकायदेशीरपणे व्यापार करणाऱ्या ४ विक्रेत्यांवरही नियमानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हे अभियान मध्य रेल्वे प्रशासनाच्या वतीने एकूण आठ रेल्वे स्थानकांवर राबवण्यात आले. यामध्ये अकोल्यासह अमरावती, बडनेरा, मुरावली, जळगाव, नाशिक रोड, मनमाड आणि खंडवा या स्थानकांचा समावेश आहे. या मोहिमेत ५५ तिकीट तपासणी कर्मचारी आणि रेल्वे सुरक्षा दलाच्या ९ जवानांच्या पथकाने सहभाग नोंदवला.

# आकोलखेड जिल्हा परिषद शाळेत बिजोत्सवात पत्रकारांचा सत्कार

प्रतिनिधी ६ मार्च

**अकोट :** आकोलखेड येथे संत तुकाराम महाराज बिजोत्सवाचे औचित्य शाळेचे माजी विद्यार्थी असणाऱ्या पत्रकार द्वयांचा सत्कार मुख्याध्यापक रत्नाकर रेळे व शिक्षकांच्या उपस्थितीत झाला.जगद्गुरु तुकारामांच्या प्रतिमा पूजनानंतर मेघश्याम महाजन व मिनाक्षीताई यांचा शाळेप्रती दिलेला योगदानाबद्दल सपत्नीक सत्कार तसेच पत्रकार धन्नु बायवार यांचा सुद्धा सत्कार शाल श्रीफळ देऊन विक्रम पूंडकर, रेळे यांनी केला.पालक या नात्याने पत्रकार महाजन यांनी शाळेसाठी पुढाकार घेण्याची ग्वाही दिली.

विक्रम पुंडकर , छायाताई तायडे ,माधुरीताई शिंगणे, ललिता सोळंके ,वनिता रजाने ,कल्पनाताई ठग व विद्यार्थी उपस्थित होते. विशेष म्हणजे पटसंख्या वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षणात वापर करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन पत्रकारांनी दिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रियाताई




तेल्हारकर व शालिनीताई हागे यांचे सहकार्य लाभले .याप्रसंगी शाळेचे माजी विद्यार्थी असलेल्या श्री संत वासुदेव महाराज लिखित श्री संत तुकाराम महाराज चरित्राचा व ३७ ग्रंथांचा उल्लेख करीत त्यांना व छत्रपतींचे गुरु असलेल्या तुकाराम महाराजांना नमन करण्यात आले. हारुनभाई यांनी तुकाराम महाराजांना नमन केले.

# आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'अस्मिता लीग'

प्रतिनिधी ६ मार्च

♦ वसंत देसाई क्रीडांगणावर आयोजन

**अकोला :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'अस्मिता लीग' दि. ८ मार्च रोजी सकाळी ८.३० वा. वसंत देसाई क्रीडांगणावर होणार आहे. त्यात अधिकाधिक विद्यार्थिनी व महिलाभगिनींनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.

केंद्र शासनाचे क्रीडा मंत्रालय, मेरा युवा भारत केंद्र यांच्यातर्फे उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, विद्यार्थिनी व महिलांसाठी १३ वर्षांखालील, १३ ते १८ वर्ष, १८ हून अधिक अशा तीन वयोगटात १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर धावण्याची स्पर्धा घेण्यात येणार आहे. सहभागासाठी 'माय भारत' पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, ऑफलाईन नोंदणीही सकाळी ७.३० ते ८ वा. पर्यंत करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा युवक अधिकारी महेशसिंह शेखावत यांनी दिली. उपक्रमाच्या पूर्वतयारीबाबत निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांनीही बैठकीद्वारे आढावा घेतला. उपक्रमात अधिकाधिक नोंदणी व्हावी. शाळा-महाविद्यालयांचा सहभाग मिळवावा. क्रीडांगण व्यवस्थापन, ऑफलाईन नोंदणीसाठी बुथ, स्वयंसेवक व्यवस्था, पेयजल, आरोग्य पथक, पोलीस बंदोबस्त आदी व्यवस्था काटेकोरपणे ठेवण्याचे निर्देश विविध यंत्रणांना देण्यात आले. उपक्रमात जिल्हा क्रीडा कार्यालय, स्काऊट-गाईड कार्यालय, शिक्षणाधिकारी कार्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विविध शाळा-महाविद्यालये, महिला आर्थिक विकास महामंडळ यासह विविध संस्थांचा सहभाग मिळविण्यात आला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# 15 महसुली सेवा एकाच ठिकाणी मिळणार

## यवतमाळ जिल्ह्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' अभियान

प्रतिनिधी ६ मार्च

**यवतमाळ :** ग्रामीण भागातील नागरिकांचे महसूल विभागाशी संबंधित प्रश्न मार्गी लावण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान – टप्पा १' राबविण्यात येणार आहे. या अभियानाची सुरुवात ७ मार्चपासून होणार असून ते २२ मे २०२६ पर्यंत जिल्ह्यातील विविध महसूल मंडळ आणि नगरपरिषद स्तरावर टप्प्याटप्प्याने आयोजित केले जाणार आहे.

या शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना १५ पेक्षा अधिक महसुली सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली फेरफार प्रकरणे निकाली काढणे, ७/१२ उताऱ्यातील त्रुटी दुरुस्त करणे तसेच डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ व ८-अ उतारे वितरित करणे यांचा यात समावेश आहे. याशिवाय उत्पन्न, रहिवासी, जात व नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र देण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. अकृषक (एनए) परवानगीसंदर्भातील मार्गदर्शन, सनद प्रक्रियेबाबत माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजूर करणे, विद्यार्थ्यांना आवश्यक दाखले वाटप, तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघनासंबंधी प्रकरणांचा निपटारा, घरांसाठी पट्टे वाटप तसेच ई-मोजणी अर्ज स्वीकारणे अशी कामेही या शिबिरांत करण्यात येणार आहेत.

तसेच ॲग्रीस्टॅक आणि पीएम किसान नोंदणी, भूसंपादन व अकृषक परवानगी प्रकरणांमध्ये कमी-जास्त पत्रके तयार करणे आणि गाव दप्तर अद्यावत करण्याचे कामही या अभियानांतर्गत होणार आहे. शिबिराच्या दिवशी अंतिम मंजुरी आदेश व दुरुस्त कागदपत्रे मिळण्यासाठी नागरिकांनी आवश्यक अर्ज व कागदपत्रे शिबिराच्या दिनांकापूर्वी संबंधित तलाठी किंवा मंडळ अधिकाऱ्याकडे जमा करावीत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

'प्रशासन आपल्या दारी' या संकल्पनेतून प्रशासन थेट नागरिकांच्या सेवेत येत असून जिल्ह्यातील नागरिकांनी या महसूल समाधान शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे.

### मंडळनिहाय शिबिरे

अभियानाच्या पहिल्या टप्प्यात ७ मार्च रोजी हर्जुना (ता. यवतमाळ), वेणी (ता. बाभुळगाव), लोनबेहळ (ता. आर्णी), चिखली (ता. दारव्हा), शिरजगाव (ता. नेर), बोरी खुर्द (ता. पुसद), तुपटाकळी (ता. दिग्रस), कुपटी (ता. उमरखेड), हिवरा (ता. महागाव), चालबर्डी (ता. केळापूर), शिरोला (ता. घाटंजी), शिबला (ता. झरीजामणी), गणेशपूर (ता. वणी), मार्डी (ता. मारेगाव), वरध (ता. राळेगाव) आणि सावरगाव (ता. कळंब) येथे शिबिरे होणार आहेत. १४ मार्च रोजी लोहारा (ता. यवतमाळ), सावर (ता. बाभुळगाव), जवळा (ता. आर्णी), लोही (ता. दारव्हा), मोझर (ता. नेर), वरुड (ता. पुसद), सिंगद (ता. दिग्रस), निंगपूर (ता. उमरखेड), काळी दौ (ता. महागाव), केळापूर (ता. केळापूर), साखर खुर्द (ता. घाटंजी), खडकडोह (ता. झरीजामणी), राजुरा (ता. वणी), वनोडी (ता. मारेगाव), वाढोणा (बा) (ता. राळेगाव) आणि पिंपळगाव (ता. कळंब) येथे शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. त्यानंतर २४ मार्च, १ एप्रिल, १० एप्रिल, १७ एप्रिल, २९ एप्रिल, ८ मे, १५ मे आणि २२ मे २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील इतर महसूल मंडळांमध्येही टप्प्याटप्प्याने शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

# मार्च एंडिंगच्या घाईत विकासकामांची गुणवत्ता धोक्यात; ठेकेदार-अधिकाऱ्यांवर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी ६ मार्च



**उमरखेड :** आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात रखडलेल्या विकासकामांना अचानक वेग आला असला, तरी ही कामे घाईघाईत उरकली जात असल्याने त्यांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विविध विभागांमार्फत मंजूर झालेल्या कामांमध्ये दर्जाहीन कामे होत असल्याची चर्चा असून, जनहितासाठी मिळालेला निधी ठेकेदारांच्या घशात जात असल्याची भीती नागरिक व्यक्त करीत आहेत.

मागील काही महिन्यांपासून अनेक विकासकामे मंद गतीने सुरू होती, तर काही कामे रखडलेल्या अवस्थेत होती. मात्र आर्थिक वर्षाच्या अखेरीस देयके काढण्याची घाई सुरू झाल्याने आता अनेक कामे झटपट पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे चित्र तालुक्यात दिसून येत आहे. या घाईगडबडीत कामांच्या गुणवत्तेला दुय्यम स्थान दिले जात असल्याची टीका होत आहे.

रस्ते विकास, पाणीपुरवठा, आरोग्य, जलसंपदा आदी विविध विभागांतर्गत तालुक्यात कोट्यवधी रुपयांची कामे सुरू आहेत. आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी ही कामे पूर्ण झाल्याचे दाखवून देयके काढण्याच्या घाईत काही ठिकाणी निकृष्ट दर्जाची कामे होत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. अशा कामांवर देखरेख ठेवण्याची जबाबदारी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

काही ठेकेदारांकडून थातूर-मातूर पद्धतीने कामे केल्याचा आरोप होत असून, त्याकडे प्रशासनातील अधिकारी अर्थपूर्ण दुर्लक्ष करत असल्याची ओरड जनसामान्यातून होत आहे. तालुक्यात कोट्यवधी रुपयांची कामे सुरू असतानाही लोकप्रतिनिधीही या विषयावर उघडपणे बोलण्यास तयार नसल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे निकृष्ट दर्जाची कामे करून देयके लाटण्याचा प्रकार वाढत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

जनतेला पक्के रस्ते, स्वच्छ व मुबलक पाणी, दर्जेदार आरोग्य सेवा तसेच शेतीसाठी सिंचन सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी दिला जातो. मात्र या निधीतून जर सुमार दर्जाची कामे झाली, तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी वाया जाण्याची शक्यता असून याबाबत प्रशासनाने तत्काळ लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## दुचाकीची चोरी

प्रतिनिधी ६ मार्च

**मारेगाव :** मारेगाव पोलीस स्टेशन अंतर्गत गदाजी बोरी येथे ३ मार्चला एका भाविकाची दुचाकी चोरीला गेली. फिर्यादी अशोक रमेश चनेकार रा. कुंभा हे गदाजी बोरी येथील यात्रेला गेले होते. त्यांनी आपली काळ्या रंगाची स्प्लेंडर गाडी (क्र. एम.एच. २९ बी.डब्ल्यू. १८७१) यात्रेच्या ठिकाणी उभी केली होती. मात्र, सायंकाळी ५ ते ५:४५ च्या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांच्या गाडीचे लॉक तोडून ती चोरून नेली. अशोक चनेकार यांनी दिलेल्या तक्रारीवरून मारेगाव पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# ९६ हजारांचा अवैध दारूसाठा जप्त

प्रतिनिधी ६ मार्च



**उमरखेड :** जिल्ह्यात अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या मोहिमेत पोफाळी पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ९६ हजार २१० रुपयांचा अवैध दारूसाठा जप्त केला. मोठा बोधा (ता. महागाव) येथे दोन ठिकाणी छापे टाकून ही कारवाई करण्यात आली. दरम्यान, तालुक्यात अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असताना राज्य उत्पादन शुल्क विभाग मात्र निष्क्रिय असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पोफाळी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भारत रामभाऊ पाईकराव (वय ५७) यांच्या घराशेजारील टिनशेडमध्ये छापा टाकण्यात आला. येथे पाच मोठ्या प्लास्टिक ड्रममध्ये प्रत्येकी १०० लिटरप्रमाणे एकूण ५०० लिटर सडवा मोहामाच साठवलेला आढळून आला. या मोहामाची किंमत सुमारे ५० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच गावठी, देशी व विदेशी दारू मिळून ५६ हजार २१० रुपयांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला.

यानंतर सूर्यभान बळीराम मोहकर यांच्या शेताजवळील नाल्याजवळ दुसरी कारवाई करण्यात आली. येथे चार प्लास्टिक ड्रममध्ये प्रत्येकी १०० लिटरप्रमाणे एकूण ४०० लिटर सडवा मोहामाच (किंमत अंदाजे ४० हजार रुपये) हस्तगत करण्यात आला.

दोन्ही ठिकाणांहून मिळून एकूण ९६ हजार २१० रुपयांचा अवैध दारूसाठा पोलिसांनी जप्त केला असून संबंधितांविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. ठाणेदार निलेश शेंबडे, पोलीस उपनिरीक्षक सुरेश शिंदे, पोलीस हवालदार प्रभाकर जाधव व चालक फिरोज काझी यांनी या कारवाईत सहभाग घेतला असून पुढील तपास सुरू आहे.

### उत्पादन शुल्क विभाग निष्क्रिय ?

■ उमरखेड तालुका व उपविभागात बनावट देशी-विदेशी तसेच हातभट्टी दारूची विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असल्याची चर्चा असताना राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अद्याप ठोस कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. उलट पोलीस विभाग सातत्याने कारवाया करत असल्याने उत्पादन शुल्क विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# ओबीसी जनजागृती सभा; जातनिहाय जनगणनेसाठी जनआंदोलन उभारण्याचा निर्धार

प्रतिनिधी ६ मार्च



**यवतमाळ :** ओबीसी संवर्गाची जातनिहाय जनगणना करण्यात यावी तसेच राष्ट्रीय जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम असावा, ही मागणी ओबीसी समाजाचा मूलभूत अधिकार असल्याचे मत व्यक्त करत या मागणीसाठी राज्यभर व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्धार येथील ओबीसी जनजागृती सभेत करण्यात आला. ओबीसी समाजाचे प्रबोधन व संघटन बळकट करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही सभा उत्साहात पार पडली.

सभेत ओबीसी समाजाच्या जातनिहाय जनगणनेचे सामाजिक, शैक्षणिक व राजकीय महत्त्व यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. समाजाच्या विकासासाठी अचूक लोकसंख्येची माहिती असणे आवश्यक असल्याचे मत वक्त्यांनी मांडले. त्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेचा ठराव घेऊन ओबीसींच्या जातनिहाय जनगणनेची मागणी केंद्र सरकारकडे पाठविण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

तसेच नगरपरिषद सदस्यांची भेट घेऊन त्यांच्याकडूनही यासंदर्भातील ठराव मंजूर करून घेण्याचे ठरविण्यात आले. जिल्ह्यातील आमदार व खासदारांची भेट घेऊन ओबीसी समाजाच्या जातनिहाय जनगणनेची मागणी त्यांच्यासमोर ठामपणे मांडण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. मार्च महिन्यात भंडारा येथे ओबीसी समाजाचा भव्य मोर्चा आयोजित करण्यात येणार असून यवतमाळ जिल्ह्यातून मोठ्या संख्येने नागरिक सहभागी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच "ओबीसींची जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे" असा संदेश देणारे फ्लेक्स प्रत्येक ओबीसी कुटुंबाच्या घरावर लावण्याचा निर्णयही सभेत घेण्यात आला. ओबीसी संवर्गातील विविध जातींच्या स्वतंत्र सभा आयोजित करून समाजात जनजागृती करण्यावरही भर देण्यात आला. गावागावात, चौकात, चावडीत तसेच सभागृहांमध्ये बैठका घेऊन जातनिहाय जनगणनेचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या सभेला डॉ. ज्ञानेश्वर गोरे, डॉ. विलास काळे, ओबीसी शिक्षक-कर्मचारी-अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शशिकांत लोळगे, सुनीता काळे, गोविंद चव्हाण, ॲड. अरुण सांगळे, आचार्य गोपाल ढोमणे, डॉ. गणेश सव्वालाखे, ज्ञानेश्वर रायमल, अनिल जीभकाटे, देवराव जी., सुरेश वडतकर, अशोक मोहुर्ले, रणजीत चव्हाण आदी उपस्थित होते. सभेचे आभार प्रदर्शन शशिकांत लोळगे यांनी केले.

# कचरा डेपोला भीषण आग; विषारी धुरामुळे नागरिक त्रस्त

प्रतिनिधी ६ मार्च



**पांढरकवडा :** शहरातील घनकचरा व्यवस्थापन केंद्राला पुन्हा एकदा भीषण आग लागल्याने नगरपरिषद प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून निघालेल्या विषारी धुरामुळे परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होत असल्याने संतापाची लाट पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ४ मार्च रोजी सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास शहरातील कचरा डेपोमध्ये आग लागली. मात्र सायंकाळपर्यंत आग पूर्णपणे आटोक्यात आणण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

विशेष म्हणजे घनकचरा व्यवस्थापन केंद्राच्या मागील बाजूस मोठ्या प्रमाणात साचलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळच वारंवार आग लागण्याच्या घटना घडत आहेत. फेब्रुवारी महिन्यातही याच ठिकाणी आग लागली होती. त्यामुळे प्रत्येक वेळी त्याच जागी आग कशी लागते, याबाबत नागरिकांमध्ये संशय व्यक्त केला जात आहे.

काही नागरिकांच्या मते, साचलेला जुना कचरा नष्ट करण्यासाठी किंवा त्याचे वजन कमी दाखवण्यासाठी कचरा जाळण्याचा प्रकार केला जात आहे का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. दरम्यान, रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास कृष्णा टेकडी परिसरात धुराचे मोठे लोट पसरल्याने संपूर्ण परिसर धुक्यासारखा दिसू लागला. जळकट वास आणि विषारी धुरामुळे अनेकांना श्वास घेण्यास त्रास, डोळ्यांची जळजळ, खोकला व चक्कर येण्यासारख्या समस्या जाणवल्याचे नागरिकांनी सांगितले. सकाळी मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या नागरिकांनाही या धुराचा त्रास सहन करावा लागला.

दरम्यान, एवढे गंभीर संकट असतानाही नगरपरिषदेचे अधिकारी व आरोग्य विभागाने तातडीने ठोस पावले का उचलली नाहीत, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करावे, अशी मागणी पांढरकवडा शहरातील नागरिकांनी केली आहे.

# 'महाराजस्व' अभियानातून नागरिकांना जलद सेवा; आर्णीत ७ मार्चपासून समाधान शिबिर

प्रतिनिधी ६ मार्च



**आर्णी :** राजस्व प्रशासन अधिक लोकाभिमुख व कार्यक्षम करण्यासाठी शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत आर्णी तहसीलमध्ये मंडळ स्तरावर समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरांमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या विविध राजस्व संबंधी कामांचे जलद निराकरण होणार असल्याची माहिती तहसीलदार वैशाख वाहुरवाघ यांनी दिली.

तहसील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. त्यांनी सांगितले की, महाराजस्व अभियानाच्या टप्पा क्रमांक ९ अंतर्गत शासनाने मंडळ स्तरावर एकदिवसीय समाधान शिबिरे घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार आर्णी तहसीलमध्ये सहा राजस्व मंडळांमध्ये टप्प्याटप्प्याने शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या शिबिरांमध्ये प्रगत फेरफार, जमिनीची तुकडाबंदी, कागदपत्रांतील दुरुस्ती, विविध दाखले, जात प्रमाणपत्र, उत्पन्न व इतर आवश्यक प्रमाणपत्रे यासारख्या कामांचे तत्काळ निराकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांना तहसील कार्यालयाच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागणार नाहीत.

तहसीलदार वाहुरवाघ यांनी सांगितले की, लोनबेहल येथे ७ मार्च, जवला येथे १४ मार्च, सावली येथे २० एप्रिल, बोरगाव येथे २७ एप्रिल, अंजनखेड येथे ४ मे आणि आर्णी येथे १५ मे रोजी समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरांमध्ये नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करण्यासाठी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. 'शासन आपल्या दारी' या संकल्पनेनुसार राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा लाभ सर्वसामान्य नागरिकांनी घ्यावा, असे आवाहनही तहसीलदार वैशाख वाहुरवाघ यांनी यावेळी केले. या उपक्रमामुळे नागरिकांचा वेळ वाचणार असून राजस्व कामे अधिक वेगाने मार्गी लागतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# लोकसहभागातून जिल्ह्यात 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' मोहीम

## नागरिकांनो सहभागी व्हा - आरोग्य विभागाचे आवाहन; १ एप्रिलपासून अभियानास सुरुवात

प्रतिनिधी ६ मार्च

**यवतमाळ :** राज्यातील ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम, रोगमुक्त व स्वयंपूर्ण करण्याच्या उद्देशाने आरोग्यमंत्री ना. प्रकाश आबिटकर यांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या "माझं गाव, आरोग्य संपन्न गाव" या महत्वाकांक्षी अभियानास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. लोकसहभागावर आधारित ही राज्यव्यापी आरोग्य चळवळ मंत्रिमंडळ बैठकीत मान्य करण्यात आली असून १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत जिल्ह्यात हे अभियान राबविण्यात येणार आहे.

राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्ह्यातही "माझं गाव, आरोग्य संपन्न गाव" ही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाचे आरोग्य सुदृढ राहावे तसेच आरोग्य सुविधा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचाव्यात, यासाठी या मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे. गावपातळीवर नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी, प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्य सेवांना चालना देण्यासाठी तसेच आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी ही मोहीम प्रभावी ठरणार आहे. सार्वजनिक स्वच्छता, सुरक्षित पाणीपुरवठा, सामाजिक प्रबोधन या सह ग्रामीण भागातील विविध घटकांच्या समन्वयाने आरोग्यदायी गाव निर्माण करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या अभियानांतर्गत उपचारांपेक्षा आजार होऊ नयेत यावर विशेष भर देण्यात येणार आहे. संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, माता-बाल आरोग्य सुधारणा, पोषण, स्वच्छता, सुरक्षित पाणी, सांडपाणी व्यवस्थापन, आरोग्यदायी जीवनशैली, जलजन्य आजारांचे नियंत्रण तसेच मानसिक आरोग्य या विषयांचा या मोहिमेत समावेश करण्यात आला आहे. नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस आहे.

"माझं गाव, आरोग्य संपन्न गाव" योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर समित्या स्थापन करण्यात येणार आहेत. आरोग्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती कार्यरत राहणार असून विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, आयुक्त व संचालक हे सदस्य असतील. तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कृती समितीही स्थापन करण्यात येणार आहे.

आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार गावांचे मूल्यमापन करण्यात येणार असून एकूण गुणांपैकी ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना "आरोग्य संपन्न गाव" म्हणून घोषित करण्यात येईल. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र तसेच रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. या अभियानासाठी सुमारे ८०.७५ कोटी रुपयांच्या निधीस मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. ही योजना केवळ आरोग्य विभागापुरती मर्यादित नसून समाजातील सर्व घटकांच्या सहभागातून उभी राहणारी लोकचळवळ ठरणार आहे. त्यामुळे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा मिळण्यासह आरोग्यदायी महाराष्ट्र घडविण्याच्या संकल्पनेला बळकटी मिळणार आहे.

सदर योजना यवतमाळ जिल्ह्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार असून याबाबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांना या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

# 'महाराजस्व' विशेष शिबिर; महसूल सेवा गावपातळीवर

प्रतिनिधी ६ मार्च

**यवतमाळ :** तालुक्यातील नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा थेट गावपातळीवर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अभियानांतर्गत मंडळनिहाय विशेष महसूल शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरांमुळे शेतकरी, महिला, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांची अनेक प्रलंबित कामे एकाच ठिकाणी मार्गी लागणार असल्याची माहिती तहसीलदार योगेश देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या अभियानाच्या पहिल्या टप्प्यात यवतमाळ तालुक्यात विविध मंडळांमध्ये टप्प्याटप्प्याने शिबिरे घेण्यात येणार असून नागरिकांना महसूल विभागाशी संबंधित सेवा थेट उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांना तहसील कार्यालयाच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागणार नाहीत आणि वेळ व श्रम यांची बचत होईल, असे तहसीलदार देशमुख यांनी सांगितले.



जिल्हाधिकारी विकास मीना तसेच उपविभागीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात येत आहे. शिबिरांमध्ये शेतकऱ्यांची प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, सातबारा व ८-अ उताऱ्यातील त्रुटी दुरुस्त करणे तसेच डिजिटल स्वाक्षरीयुक्त उतारे तात्काळ उपलब्ध करून देण्याची सुविधा दिली जाणार आहे. याशिवाय उत्पन्न, जात, रहिवासी व नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्रांचे अर्ज स्वीकारून त्यांचे तातडीने वितरण केले जाईल. तुकडेबंदी व्यवहाराबाबत मार्गदर्शन, अकृषक परवानगीसंबंधी माहिती, ई-मोजणी अर्ज स्वीकृती, ॲग्रीस्टॅक व पीएम किसान नोंदणी तसेच भूसंपादनासंबंधी कमी-जास्त पत्रके तयार करण्याची सुविधाही शिबिरांमध्ये उपलब्ध राहणार आहे. शिबिरांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून ७ मार्च रोजी हर्जुना मंडळ, १४ मार्च रोजी लोहारा, २४ मार्च रोजी येळाबारा, १ एप्रिल रोजी कापरा (मे.), १० एप्रिल रोजी मोहा, १७ एप्रिल रोजी अकोला बाजार, २९ एप्रिल रोजी कोळंबी, ८ मे रोजी हिवरी, १५ मे रोजी सावरगड आणि २२ मे रोजी यवतमाळ मंडळ येथे शिबिरे होणार आहेत. संबंधित नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करून या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार योगेश देशमुख यांनी केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि. ६ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# वाशीम शहरात कृत्रिम पाणी टंचाई...
# नियोजनाचा अभाव, कसा होणार निभाव !

## १० ते १२ दिवसाआड गढूळ पाण्याचा पुरवठा : नागरिकांचे आरोग्य धोक्यात

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशिम शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या एकूणज धरणात ४० टक्के मुबलक पाणी साठा असतानाही नियोजनाअभावी शहरात कृत्रिम पाणी टंचाई निर्माण झाली आहे. १० ते १२ दिवसाआड नळाद्वारे पाणी पुरवठा होत असून तेही पाणी गढूळ असल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

२४ तास पाणी पुरवठ्याचे आश्वासन देणारे नगर प्रशासन नियोजनाच्या अभावामुळे नागरिकांना वेळेवर स्वच्छ पाणी देऊ शकत नाही. चार दिवसातून एकदा तरी शुद्ध पाणी द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. शहरातील काही भागात पाण्याचा अपव्ययही होत असल्याचे दिसून येत आहे. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या हिंगोली रोडवरील पाण्याच्या टाकीमधूनही लाखो लिटर पाण्याचा अपव्यय होत असल्याची चर्चा आहे.शहरात ठिकठिकाणी गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्यामुळे नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. १० ते १२ दिवसांनी पाणी येत असल्यामुळे नागरिकांना साठवून ठेवलेल्या पाण्यावरच अवलंबून राहावे लागत आहे. काही ठिकाणी या गढूळ पाण्यामुळे रस्त्यांचीही अवस्था खराब झाली आहे.नागरिकांकडून नवीन नळ कनेक्शन देऊन हजारो रुपये वसूल केले जातात. दरवर्षी पाणी कराच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा महसूल नगरपालिकेला मिळतो. तरीदेखील शहरातील पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.दरम्यान, पावसाळा चांगला झाल्यामुळे एकूणज धरणात पुरेसा पाणी साठा आहे. मात्र तरीही शहराला नियमित आणि स्वच्छ पाणी पुरवठा होत नसल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

प्रशासनाने तातडीने पाणीपुरवठा व्यवस्थेचे नियोजन करून नागरिकांना नियमित व स्वच्छ पाणी द्यावे, अशी मागणी होत आहे.





### नळाचे पाणी रस्त्यावर, गटाराचे पाणी नळात...

शहरात ठिकठिकाणी पाण्याचा अपवय होत असून नळाचे पाणी रस्त्यावर वाहत आहे. तर गटाराचे पाणी नळाच्या पाण्यात जात असल्याचा प्रकार घडत आहे. त्यामुळे गढुळ पाण्याबरोबरच गटाराचे पाणीही नागरिकांना प्यावे लागत आहे. २४ तास शुध्द पाणी देण्याचे आश्वासन हवेतच विरले आहे. त्यामुळे चार दिवसाआड तरी शुध्द पाणी द्यावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

बातमी खास, दाखल हमखास, सिटी न्यूज सुपरफास्ट...

# 'त्या' बातमीची दखल; धोकादायक पुलावर अखेर बसले कठडे !



●प्रभाकर नाईकवाडे @ केनवड●


अर्धवट काम मोक्यात, जीवन धोक्यात !

अर्धवट कामाची भूल, कठाड्याविना पूल

धोकादायक पुलाचे काम पुर्ण, कड्याचे काम अपूर्ण * जालना - पुलगाव महामार्गावरील प्रकार

जालना-पुलगाव राष्ट्रीय महामार्गावरील मेहकर-मालेगाव पिंपरी सरहद्द गावाजवळील खारोळ नाल्यावरील पुलाच्या धोकादायक अवस्थेबाबत सिटी न्यूज सुपरफास्टने ६ फेब्रुवारी रोजी 'अर्धवट काम मोक्यात, जीवन धोक्यात; धोकादायक पुलाचे काम पूर्ण, कठड्याचे काम अपूर्ण - जालना-पुलगाव महामार्गावरील प्रकार' या मथळ्याखाली सविस्तर वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताची अखेर संबंधित प्रशासनाने दखल घेतली असून पुलावर सुरक्षा कठडे बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

सदर पुलाची काही दिवसांपूर्वी दुरुस्ती करण्यात आली होती. मात्र दुरुस्ती पूर्ण झाल्याचा दावा करण्यात आला असतानाही पुलावर आवश्यक असलेले सुरक्षा कठडे बसविण्यात आले नव्हते. पुलाच्या दोन्ही बाजूंना अंदाजे १० ते १५ फूट खोल उतार असल्याने वाहन घसरल्यास थेट नाल्यात कोसळण्याचा गंभीर धोका निर्माण झाला होता. त्यामुळे हा पूल अपघाताला आमंत्रण देणारा ठरत असल्याची स्थिती निर्माण झाली होती.जालना–पुलगाव हा महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग असून या मार्गावरून दररोज दुचाकी, चारचाकी, ट्रॅक्टर तसेच शेतमाल वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असते. परिसरातील शेतकरी, व्यापारी तसेच प्रवासी यांच्यासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र एवढ्या वर्दळीच्या मार्गावर मूलभूत सुरक्षा उपाययोजना न करता वाहतूक सुरू करण्यात आल्याने स्थानिक नागरिक व वाहनधारकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत होती.पुलावर कठडे नसल्यामुळे विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनधारकांना मोठा धोका निर्माण होत होता. कमी प्रकाश, अरुंद पूल तसेच कोणत्याही प्रकारचे सावधानता फलक किंवा दिशा दर्शक चिन्हे नसल्यामुळे वाहनधारकांना पुलावरून जाताना मोठी कसरत करावी लागत होती. त्यामुळे या ठिकाणी कधीही मोठा अपघात होण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात होती.या पार्श्वभूमीवर सिटी न्यूज सुपरफास्टने जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा मुद्दा ठळकपणे मांडत वृत्त प्रसिद्ध केले होते. या वृत्ताची दखल घेत अखेर संबंधित विभागाने पुलावर मजबूत सुरक्षा कठडे बसविण्याचे काम पूर्ण केले आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, स्थानिक नागरिकांनी माध्यमांच्या पाठपुराव्याचे कौतुक करत समाधान व्यक्त केले आहे. 'वेळीच दखल घेतल्यामुळे संभाव्य मोठा अपघात टळू शकतो,' अशी प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. तसेच भविष्यात महामार्गावरील कोणतेही बांधकाम किंवा दुरुस्तीचे काम करताना सर्व सुरक्षा उपाययोजना पूर्ण केल्यानंतरच वाहतूक सुरू करावी, अशीही मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## थोडक्यात

### कारंजा तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराचे आयोजन



●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

सर्व सामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्न तात्काळ निकाली काढण्यासाठी तरोच महसूल प्रशारान अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या उद्देशाने कारंजा तालुक्यात मंडळ स्तरावर 'छत्रपती शिवाजी महाराज महाराज महसूल समाधान शिबिर'अभियानाचे आयोजन करण्यात येणार आहे.अशी माहिती उपविभागीय अधिकारी आकाश वर्मा यांनी पत्रकार परिषदेत दिली.या शिबिरांद्वारे प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, अभिलेख दुरुरती हेल्प डेरक, लोकरोवा हक्क कायद्यानुसार तात्काळ सेवा, अकृषक तरतुदीं विषयी मार्गदर्शन, भूरांपादन व अकृषिक परवानगी संबंधी प्रकरणांतील कमी-जारत पत्रके तयार करून गाव दप्तर अद्ययावत करणे तरोच इतर विविध समस्यांचे निराकरण करण्यात येणार आहे.या कामासाठी रोतू केंद्र तरोच संबंधित विभागांचे कर्मचारी सहकार्य करणार आहेत.तरी सर्व शेतकरी बाधवानी या शिबिराचा लाभ घ्यावा अरो आवाहन उपविभागीय अधिकारी कारंजा यांनी केले आहे.यावेळी नायब तहसीलदार वाडेकर, तहसील कर्मचारी, मंडल अधिकारी तसेच पत्रकार बांधव उपस्थित होते.

### कविता संग्रहाचा प्रकाशन सोहळा

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक मैदानात परिवर्तनवादी महीला मंडळ आणि संथागार बहुउद्देशीय अल्पसंख्यांक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जेष्ठ कवी भीमराव शृंगारे लिखित प्रज्ञासूर्याच्या उजेडाची फुले हा तीसरा कवीता संग्रह नगराध्यक्ष मा..अशोकभाऊ परळीकर यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन सोहळा मोठ्या थाटात पार पडला. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी मा.विशाल क्षीरसागर डॉ.विठ्ठल खाडे ,अरविंद भगत यांची प्रमुख उपस्थिती होती , कार्यक्रमाचे व्यवस्थापन युवराज प्रधान ,फकीरा शृंगारे यांनी केले व कार्यक्रमाचे संचालन वआभार प्रदर्शन संदीप कांबळे यांनी मानले.

# पत्नीचा खून; आरोपी पतीस जन्मठेप !

## २०२१ च्या घटनेत मंगरूळपीर सत्र न्यायालयाचा निकाल

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

पत्नीच्या खुनप्रकरणी मंगरूळपीर तालुक्यातील मनोली येथील आरोपी रोशन विजय उगले याला अतिरिक्त सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश वैभव व्ही. पाटील यांनी गुरुवार, ५ मार्च रोजी हा निकाल दिला. न्यायालयाने आरोपीला भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अंतर्गत जन्मठेपेची शिक्षा व १० हजार रुपयांचा दंड ठोठावला. दंड न भरल्यास एक वर्ष अतिरिक्त साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे.



प्रकरणातील फिर्यादी श्रीकृष्ण तुकाराम नाकोडे (रा. आराखेड, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम) यांनी १० एप्रिल २०२१ रोजी तक्रार दिली होती. त्यांची मुलगी रीना हिचा जन्म २९ जुलै २००० रोजी झाला होता. रीना हिचा विवाह १८ मार्च २०२१ रोजी आरोपी रवीशंकर नाकोडे याच्याशी झाला होता.लग्नानंतर काही काळ सर्व काही सुरळीत असले तरी आरोपीने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला छळ सुरू केल्याची तक्रार नोंद करण्यात आली. या कारणावरून पती-पत्नीमध्ये वाद होत असल्याचेही सांगण्यात आले.१८ मार्च २०२१ रोजी आरोपीने रिनाला मंगरूळपीर येथील निवासस्थानी मारहाण करून ठार केल्याचा आरोप होता. नातेवाईकांना देण्यात आलेल्या माहितीवरून घटनास्थळी पाहणी केली असता आरोपीने लोखंडी पाईपने मारहाण केल्याचे उघड झाले. त्यानंतर पोलिसांनी तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. खटल्यादरम्यान सरकारी पक्षातर्फे एकूण २१ साक्षीदारांच्या साक्षी नोंदवण्यात आल्या. काही साक्षीदार फिरले असले तरी वैद्यकीय अहवाल, रासायनिक विश्लेषण अहवाल व परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपी दोषी ठरवला.या प्रकरणात सरकार पक्षातर्फे अतिरिक्त शासकीय अभियोक्ता गोवर्धन गंगावणे यांनी बाजू मांडली. महिला पोलीस कॉन्स्टेबल सुवर्णा मनवर व पोलीस हवालदार राम नागलकर यांनी सहकार्य केले.

# भरधाव वाहन चालवून पादचाऱ्यांच्या जीवाला धोका

## कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात भरधाव कार चालवून पादचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण केल्याप्रकरणी एका कारचालकाविरुद्ध वाशिम शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र रामनाथ किडसे (वय ५७, रा. आनंदेश्वर कॉलनी, वाशिम) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १ मार्च रोजी सकाळी साडेनऊ ते दहा वाजताच्या सुमारास ते त्यांच्या कार्यालयाकडे जात असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाजवळ आरोपी रवि कुंडलिक वानखेडे हा त्याची कार (एमएच ०८ एआर ७९२६) भरधाव चालवत आला. यावेळी त्याने अचानक कट मारल्यामुळे फिर्यादी तसेच इतर पादचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला. सुदैवाने मोठा अपघात टळला; मात्र या घटनेमुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून वाशिम शहर पोलीस ठाण्यात आरोपी रवि कुंडलिक वानखेडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत. यापूर्वीही अशा प्रकारच्या तक्रारी झाल्याचे सांगण्यात येत आहे.

# शेलुबाजारात मटका जुगार पुन्हा जोमात; पोलीस प्रशासन कोमात !

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरुळपीर : शेलुबाजार शहरात दिवाळी सुटीनंतर छुप्या पद्धतीने सुरू असलेल्या मटका जुगाराने पुन्हा डोके वर काढले असून चालू आठवड्यापासून मटक्याचा बाजार जोमात सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. काही महिन्यांपूर्वी गुन्हे शाखेने काही बुकी चालकांवर कारवाई करून मुसक्या आवळल्या होत्या; मात्र त्यानंतरही शहरात पुन्हा खुलेआम मटका सुरू असल्याची चर्चा रंगली आहे.



मटका सुरू नसल्याचे पोलिसांनी यापूर्वी स्पष्ट केले होते. मात्र दिवाळीनंतर काही मटका बुकी चालकांनी टपरीधारकांना बिर्याणी पार्टी देत पुन्हा धंदा सुरू करण्याच्या सूचना दिल्याचे बोलले जात आहे. परिणामी शहरातील काही टपऱ्यांमधून पूर्वीप्रमाणेच खुलेआम चिठ्ठ्या दिल्या जात असल्याचे दिसून येत आहे. शेलुबाजारात पूर्वी शेकडो मटका टपऱ्या चालत असल्याचे सांगितले जाते. मात्र सध्या सुरू असलेल्या टपऱ्यांवर अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याने पोलिसांचा अवैध धंद्यांवर धाक कमी झाला आहे का, की काहींचे पडद्याआडून संरक्षण आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.एसटी स्टँड परिसर, बाजार चौक, काही हॉटेलजवळ तसेच नाक्यांवर मटका सुरू असल्याची माहिती मिळताच 'सिटी न्यूज सुपरफास्ट'च्या प्रतिनिधींनी तेथे भेट देऊन छायाचित्रे घेतली. यावेळी काही टपरीधारकांनीही 'पत्रकार येतात-जातात, आमचे काहीच होत नाही,' असे वक्तव्य करत प्रशासनाच्या कारवाईवरच प्रश्न उपस्थित केल्याचे सांगितले जाते.

# तऱ्हाळा येथे स्पर्धा परिक्षा अभ्यासिका सुरू !

●सिटी न्युज ब्युरो @ शेलुबाजार●

तऱ्हाळा ता.मंगरूळपीर जिल्हा वाशिम येथे दि २ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी श्रीमती पंचफुलाबाई साहेबराव देशमुख स्वातंत्र्य सैनिक MPSC-UPSC स्पर्धा परीक्षा अभ्यासिकेचे अध्यक्षिकेचे लोकार्पण सोहळ्याला उपस्थित होते. यावेळी त्यांच्यासोबत उप विभागीग अधिकारी राम काळे,वनपरिक्षेत्र अधिकारी अमित शिंदे,क्रीडा अधिकारी किशोर बोन्डे, संभाजी नगर येथील रांजणगाव चे पंचायत समिती सदस्य दीपक बढे, समाधान बढे,तहसीलदार रवी राठोड परिसरातील शेतकरी आणि ग्रामपंचायत सर्व पदाधिकारी गावकरी तंटामुक्त अध्यक्ष, शाळेचे शिक्षक कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.



प्रास्ताविक किशोर देशमुख यांनी केले वन अधिकारी,. उप विभागीय अधिकारीराम काळे, संभाजी नगर जिल्ह्यातील रांजणगाव येथील पंचायत समिती सदस्य दीपक बढे, समाधान बढे, सोलर आदर्श गाव योजनेचे संचालक आणि शेतकरी यांनी चर्चा करून आपण सर्व या निर्णया साठी बसून निर्णय घेऊ.असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. स्वामी विवेकानंद आपत्ती व्यवस्थापन पाथकाने लोगो चे निर्माण करून पथकाची ओळख म्हणून शिम्बॉल तयार केला आणि त्याचे अनावरण जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर उप विभागीय काळे, वन परीक्षेत्र अधिकारी वन्य जिव अमित शिंदे, किशोर बोन्डे जिल्हा क्रीडा अधिकारी वाशिम, किशोर शेळके ठाणेदार मंगरुळपीर, रवी राठोड, तहसीलदार, तसेच परिसरातील पोलीस पाटील सरपंच,भायजी महाराज विद्यालयाचे शिक्षक, विद्यार्थी, गावातील मान्यवर तसेच आपदा व आपत्ती व्यवस्थापन पाथकातील सर्व सदस्य उपस्थित होते. साईनाथ क्रीडा व्यायाम व शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव व आपदा आपत्ती व्यवस्थापान चे संयोजक किशोर देशमुख व त्यांचे सहकारी विनोद चाबुकस्वार, रणजित गावंडे गजानन पोफळे, नितीन देशमूख नवलं गावंडे संतोष गावंडे, अतुल देशमुख श्याम एकाडे, मदन गायकवाड किशोर आगळे, बाळू आमटे ईश्वर आमटे, दीपक देशमुख राजेंद्र गावंडे, राजकुमार गावंडे, सुवर्णा बाईस्कर, रोशनी समाधान येवले, समाधान येवले, निलेश मेटकर सागर मैसने, गणेश मैसने सचिव ग्रामपंचायत प्रमोद पिंपळकर, दिलीप भगत, संदीप साबळे, ज्ञानेश्व राठोड सुखदेव राठोड, चेतन शिंदे, शाम ठाकरे, सरपंच संघटनेचे प्रमुख सुदर्शन पाटील धोटे, गोपाल पाटील लुंगे, नंदुकुमार मुळे पाटील अरुण देशमुख रुद्र देशमुख, राजरत्न पोफळे,युवक युवती उपस्थित होते.

# पत्नीला त्रास देणाऱ्या युवकाचा पतीकडून खून; पोलिसांनी काही तासांत आरोपीला केली अटक

●सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

पत्नीला वारंवार त्रास देत असल्याच्या रागातून एका पतीने युवकाचा दगडाने ठेचून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणाचा मेहकर पोलिसांनी अवघ्या काही तासांत उलगडा करत आरोपीला अटक केली आहे.

राहुल भानुदास बाजड (वय २८, रा. जांब आढाव, ता. रिसोड, जि. वाशीम) असे मृत युवकाचे नाव असून ओम श्यामराव केनवडकर (वय ३६, रा. केनवड, ता. रिसोड, जि. वाशीम) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

४ मार्च रोजी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास मेहकर शहराजवळील खामखेड रोडवरील एमआयडीसी परिसरातील शेतात राहुल बाजड याचा दगडाने ठेचलेल्या



अवस्थेतील मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच मेहकर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी फॉरेन्सिक पथक, फिंगरप्रिंट तज्ज्ञ तसेच डॉग स्कॉडला पाचारण करण्यात आले.पोलिसांनी मृतदेहाची ओळख पटवून तपासाची चक्रे वेगाने फिरवली. गोपनीय माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी संशयित आरोपी ओम केनवडकर याचा शोध घेतला. त्याला ४ मार्च रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास केनवड येथील त्याच्या मालकीच्या शेतातून ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने खुनाची कबुली दिली.पोलिसांच्या माहितीनुसार, मृत राहुल बाजड हा काही काळापासून आरोपीच्या पत्नीला वारंवार त्रास देत होता. याबाबत आरोपीने त्याला अनेक वेळा समजावून सांगितले होते. मात्र त्याच्या वागण्यात कोणताही बदल झाला नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या आरोपीने ३ मार्च रोजी राहुलला मेहकर येथील खामखेड रोडवरील एमआयडीसी परिसरातील शेतात नेले आणि दगडाने मारहाण करून त्याचा खून केल्याची कबुली दिली.या प्रकरणी संजय किसन वाघ (वय ४०) यांच्या फिर्यादीवरून मेहकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.दरम्यान, या खून प्रकरणात अजूनही काही प्रश्न अनुत्तरित आहेत. राहुल बाजड याला मेहकर येथे नेमके कोणी आणले, आरोपीला त्याच्या येण्याची माहिती कोणी दिली, तसेच आरोपीसोबत इतर कोणी साथीदार होते का, याबाबत पोलीस तपास करत आहेत.ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक नीलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या तपासात पोलीस निरीक्षक व्यंकटेश्वर आलेवार यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली.

# भरधाव पिकअपची उभ्या ट्रकला धडक

## पिंप्री सरहद्द येथील २३ वर्षीय सोहेल खानचा जागीच मृत्यू

●सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

नागपूर–जबलपूर राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात पिंप्री सरहद्द येथील २३ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी (दि. ४ मार्च) मध्यरात्री पवनी परिसरात घडली. या घटनेमुळे पिंप्री सरहद्दसह परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, एमएच २८ बीबी ९८५१ क्रमांकाची बोलेरो पिकअप नागपूर–जबलपूर राष्ट्रीय महामार्गावरून जात असताना रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एपी ३९ टीझेड ०१४४ क्रमांकाच्या ट्रकला भरधाव वेगात जाऊन जोरदार धडकली. धडक इतकी भीषण होती की पिकअप वाहनाच्या कॅबिनचा अक्षरशः चुराडा झाला.या अपघातात पिकअपमध्ये किन्नर साईडला बसलेले सोहेल खान राजदार खान (वय २३, रा. पिंपरी सरहद्द) यांचा जागीच मृत्यू झाला, तर वाहन चालक फिरोज पठाण यांना किरकोळ दुखापत झाली. या घटनेची नोंद देवलापूर पोलीस स्टेशन हद्दीत करण्यात आली असून पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला.दरम्यान, सोहेल खान यांचा दफनविधी ४ मार्च रोजी उशिरा रात्री पिंपरी सरहद्द येथील कब्रस्तानमध्ये अत्यंत शोकाकुल वातावरणात पार पडला. त्यांच्या पश्चात आई-वडील, एक भाऊ व एक बहीण असा परिवार आहे.सोहेल हे कुटुंबातील मोठे अपत्य व घरातील कमावते सदस्य होते. त्यामुळे त्यांच्या अकाली निधनामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ते डोणगाव येथील अक्वा फिल्टरच्या पाण्याच्या गाडीवर काम करत होते. त्यांचा स्वभाव अत्यंत मनमिळावू व सर्वांना आपलेसे करणारा असल्यामुळे परिसरात त्यांची चांगली ओळख निर्माण झाली होती.ईदचा सण जवळ आल्याने कुटुंबासाठी व स्वतःसाठी कपडे खरेदी करण्यासाठी ते अतिरिक्त मजुरी करण्यासाठी काही दिवसांपासून मिस्त्री कामावर मजूर म्हणून काम करू लागले होते. मात्र नियतीला काही वेगळेच मान्य होते.घटनेच्या दिवशी सायंकाळी पिकअप चालक फिरोज पठाण यांनी एक ट्रिप मारून येण्याचे सांगितल्याने सोहेल घरातून बाहेर पडले. मात्र काही तासांतच त्यांच्या अपघाती मृत्यूची बातमी गावात पोहोचली आणि संपूर्ण गाव शोकसागरात बुडाले.मित्रपरिवारात अत्यंत लोकप्रिय असलेले सोहेल त्यांच्या हसतमुख व मैत्रीपूर्ण स्वभावामुळे सर्वांना आपलेसे वाटत होते. त्यांच्या मित्रांच्या आठवणीत अजूनही 'शाबजी, क्या भाया?' असे त्यांचे बोल घुमत असल्याचे मित्र भावुक होऊन सांगत आहेत. कमी वयात एका तरुणाचे आयुष्य असे अचानक संपल्याने परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.




सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# यंदा मार्चमध्येच सूर्य ओकणार आग

प्रतिनिधी ६ मार्च

**अकोला :** मागील चार दिवसांपासून संपूर्ण विदर्भात अमरावती शहरानंतर अकोला शहराचे कमाल तापमान ३९.५ डिग्री सेल्सिअस तसेच कमाल तापमान १८.५ डिग्री सेल्सिअस वर पोहोचले आहे. सकाळी दहा वाजता पासूनच कडाक्याचे ऊन तापत असल्याने नागरिक बेजार झाले आहेत. दुपारच्या वेळी अंगाची लाही लाही होत आहे. येणाऱ्या दिवसात नागरिकांना कडाक्याच्या उन्हाचा सामना करावा लागणार आहे. भारतीय हवामान विभागाने राज्यातील काही जिल्ह्यांसाठी येलो अलर्ट जारी केला आहे. अकोला वासियांना ही खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार आगामी पाच दिवस जिल्ह्यात हवामान पूर्णपणे कोरडे राहणार आहे यामुळे तापमानात अधिक वाढ होऊन पुढील आठवड्यात पारा ४०टक्के पर्यंत जाण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत हे तापमान ४२ अंशापर्यंत पोहोचू शकते. यापूर्वी २०२२ मध्ये मार्च महिन्यात तापमान ४३ अंशांवर गेले होते आणि दोन उष्णतेच्या लाटा आल्या होत्या यंदाही मार्च महिन्यात किमान एका उष्णतेच्या लाटेचा शहरवासीयांना सामना करावा लागण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



## शहराचे तापमान 42 डिग्रीवर जाण्याची शक्यता

### उष्णतेपासून बचाव करण्यासाठी रसाळ फळे आणि शीतपेयांकडे नागरिकांचा मोर्चा

विदर्भात उन्हाळयाची चव लागतात सूर्याने आपले रौद्ररूप दाखवायला सुरुवात केली आहे अकोला शहराचे तापमान गुरुवारी ३९.५ अंशावर पोहोचले होते दुपारच्या वेळी अंगाची लाही लाही होत आहे या वाढत्या उन्हाच्या दाहकते पासून सुटका घेण्यासाठी अकोलावासियांनी आता रसाळ फळे आणि शीतपेयांकडे आपला मोर्चा वळवला आहे. विशेष म्हणजे यंदा मार्च महिन्यातच उन्हाळयामुळे आणि रमजान महिना सुरू असल्यामुळे फळांचे दर गगनाला भिडले आहेत दक्षांसोबतच चिकू तसेच मोसंबी या फळांचीही विक्री सध्या जोरात सुरू असून मागणीतही वाढ झाली आहे शरीरातील पाण्याचे प्रमाण उन्हाळयात टिकून ठेवण्यासाठी टरबूज आणि द्राक्षांना नागरिक पसंती देत आहेत शहरातील जनता भाजी बाजार जुने शहरातील भाजी बाजार कौलखेड चौक जठार पेठ चौक आदी भागात रसाळ फळांची दुकाने लागली आहेत त्याच जोडीला शहरात अनेक ठिकाणी रसवंती तसेच कैरीपाणी विक्रीच्या गाड्या सुद्धा लागल्या आहेत. शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी नागरिक ऊसाचा रस लिंबू सरबत अननस ज्यूस आस्वाद घेत आहेत विशेषतः दुपारच्या वेळी ताक आणि लस्सी पिणाऱ्यांची संख्या सुद्धा लक्षनिय वाढली आहे.

#### शहरातून पानपोई झाल्या हद्दपार

◆दरवर्षी उन्हाळयात ठीक ठिकाणी सामाजिक संस्थांतर्फे पाणपोई उभारल्या जातात मात्र यंदा अद्याप शहरात कुठेही पानपुरी चे दर्शन घडलेले नाही त्यामुळे तहान भागविण्यासाठी नागरिकांना उसाचा रस ताक लस्सी आणि लिंबू सरबताचा आधार घ्यावा लागत आहे सकाळी ११ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत बाजारपेठेत शीतपेयांच्या गाड्या गर्दी दिसून येत आहे

#### उन्हापासून बचाव करण्याच्या आरोग्य विभागाच्या सूचना

◆तापत्या उन्हापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी जास्तीत जास्त पाणी घेऊन स्वतःला हायड्रेटेड ठेवण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे तसेच उन्हाचा त्रास टाळण्यासाठी सुती आणि हलक्या रंगाच्या कपड्यांचा नागरिकांनी वापर करावा दुपारच्या वेळी घराबाहेर पडताना डोक्यावर टोपी रुमाल किंवा छत्रीचा वापर करा कडाक्याचे ऊन असल्याने अत्यावश्यक कामे सकाळी किंवा संध्याकाळी पूर्ण करावी

# शहरात स्वच्छता राखण्यासाठी आणि प्लॅस्टिक वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका केव्हा करणार कारवाई?

प्रतिनिधी ६ मार्च



**अकोला :** सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने उन्हापासून बचाव करण्यासाठी नागरिक शितपेय, आईस्क्रीम, तसेच रसाळ फळांचा आस्वाद घेत आहेत. अनेकजण घरी पार्सल नेत आहेत. पार्सल देण्यासाठी अनेक दुकानदार प्रतिबंधित प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर करीत आहेत. शहरातील अनेक फळ विक्रेते, तसेच भाजीपाला विक्रेते, तसेच हॉटेल व्यवसाई सर्रासपणे प्लास्टिक पिशव्यांचा वापर करीत आहेत. शहरातील अनेक हॉटेल व्यवसाई तसेच दुकानदार आपल्या आस्थापनांमध्ये कचराकुंडी न वापरता इतरत्र कचरा टाकत आहेत. त्यामुळे शहरातील गांधी चौकातील चौपाटी असो जनता भाजी बाजार असो किंवा अन्य बाजारपेठ सर्वत्र कचरा साचल्याचे दिसून येत आहे. शहरात स्वच्छता राखण्यासाठी आणि प्लास्टिक वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिकेतर्फे गेल्या कित्येक महिन्यांपासून कारवाई करण्यात आलेली नाही. महापालिकेतील प्रशासक राज गेल्यानंतर जनप्रतिनिधींची सत्ता महापालिकेत स्थापन झाली आहे. परंतु अद्यापही महापालिकेवर प्रशासकीय कारभाराचा पगडा दिसून येत आहे. नगर सुधार आघाडीची सत्ता स्थापन झाल्यानंतर महापौर, उपमहापौर तसेच स्थायी समिती सभापतींची निवड झाल्यावर ही अद्याप नगर सुधार आघाडीला आपला प्रभाव दाखविता आलेला नाही. अनेक हॉटेल व रेस्टॉरंट मध्ये घाण पहावयास मिळते, अनेक हॉटेल व रेस्टॉरंट मध्ये स्वच्छता विषयक त्रुटी दिसून येत आहेत, यावरही अद्याप कुठलीही कारवाई झालेली नाही. शहरात सर्रासपणे स्वच्छता न पाळणे आणि प्लास्टिक पिशव्यांचा धडाक्यात उपयोग करणे सुरू आहे महापालिकेच्या नियमांचे उल्लंघन होत आहे हे पाहता शहरात स्वच्छता राखण्यासाठी आणि प्लास्टिक वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिकेच्या संबंधित विभागाने विशेष मोहीम सुरू करावी अशी मागणी नागरिक करीत आहे

# संस्कृती संवर्धन समितीची नवी कार्यकारिणी जाहीर

प्रतिनिधी ६ मार्च

### स्वागत समिती अध्यक्ष ब्रिजमोहन चितलांगे



**अकोला :** संस्कृती संवर्धन समितीच्या वतीने सन २०२६–२०२७ या वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची घोषणा समितीचे अध्यक्ष प्रा. नितीन बाठे यांनी केली. समाजात सांस्कृतिक परंपरांचे जतन व सामाजिक एकात्मता दृढ करण्यासाठी संस्कृती संवर्धन समिती सातत्याने विविध उपक्रम राबवत असते.या प्रसंगी मंचावर यावर्षीचे स्वागताध्यक्ष ब्रिजमोहन चितलांगे, समितीचे अध्यक्ष प्रा. नितीन बाठे, उपाध्यक्ष हरिषभाई अलिमचंदानी, मंगेश वानखडे तसेच नवनियुक्त संयोजक समीर थोडगे उपस्थित होते. यावर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त समितीच्या वतीने २०२६–२०२७ या कालावधीत विविध नाविन्यपूर्ण आणि समाजाभिमुख कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली समितीच्या वतीने वर्षभरात हिंदू नववर्ष स्वागत यात्रा २०२६, अखंड भारत दिनानिमित्त जाहीर व्याख्यान (दि. ९ ऑगस्ट २०२६), महालक्ष्मी आरास स्पर्धा २०२६, सामूहिक तुळशी विवाह २०२६ तसेच विविध प्रांतातून अकोल्यात स्थायिक झालेल्या नागरिकांना एकत्र आणणारे भारत भारती संमेलन असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

या वेळी शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे आयोजन श्री समर्थ पब्लिक, रणपिसे नगर येथे करण्यात आले होते. नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून समितीचे उपक्रम अधिक व्यापक व प्रभावी स्वरूपात राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

संस्कृती संवर्धन समिती, अकोला नवनियुक्त कार्यकारिणी २०२६-२०२७ अध्यक्ष : प्रा. नितीन बाठे, संयोजक समीर थोडगे, सहसंयोजक स्वानंद कोंडोलीकर, सहसंयोजक राम भिरड, कोषाध्यक्ष शरद वाघ स्वागत समिती अध्यक्ष ब्रिजमोहन चितलांगे, स्वागत समिती उपाध्यक्ष डॉ. पार्थसारथी शुक्ल, रामप्रकाश मिश्रा, मंगेश वानखडे, हरिशभाई अलिमचंदानी, अरविंद जा. देठे, मनिष चंदनानी, विनोदजी देव, अनिलजी गावंडे स्वागत समिती महिला उपाध्यक्षा : अर्चना शर्मा, पल्लवी रावणकर , डॉ.राधा पुरी, सोनल ठक्कर, रश्मी कायंदे, मीनाक्षी आपोतीकर, लता राठोड, महिला संयोजिका रेवती पांडे, सोनिया तऱ्हाळकर, मनीषा भुसारी, जयमाला खेडकर, विजया देशमुख, पुष्पा वानखडे, डॉ. स्नेहा गोखले, रुपाली धोत्रे, ऋतुजा पांडे, प्रचार व प्रसार प्रमुख अभयसिंग राजपूत, कार्यकारिणी सदस्य विनोद जकाते, प्रशांत पाटील, खेमराज भटकर, रूपेश वाखारकर, पंकज सादराणी, पंकज सहगल, तुषार गोतमारे,विनोद देव, जय राणे, मार्गदर्शक सदस्य नरेंद्र देशपांडे, गोपाल खंडेलवाल, डॉ. राजकुमार हेडा, ॲड मोतिसिंहजी मोहता, महेश जोशी, हेमेंद्र राजगुरू, चित्रा बापट, निलेशजी देव, निकेश गुप्ता, आनंद बांगड, पुरुषोत्तम मालाणी, डॉ. प्रविण चव्हाण आदि.

# काली बार, वाह शहरातून गायब

### बाहुबली आणि बाजीराव खाण्यास गुटखा शौकीन विवश


प्रतिनिधी ६ मार्च

**अकोला :** शहरात गेल्या काही दिवसांपासून गुटखा शौकिनांमध्ये अत्यंत लोकप्रिय असलेल्या कालि बार आणि वाह गुटखा पुड्याचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याने गुटखा शौकीन बेचैन झाले आहेत. या गुटखा पुडया मिळत नसल्याने त्यांना नव्याने बाजारात आलेल्या बाजीराव आणि बाहुबली या गुटखा पुड्या विकत घेऊन दुधाची तहान ताकावर भागवावी लागत आहे. परंतु ज्या विक्रेत्यांकडे वाह आणि कालिबार पुडयांचा जूना माल आहे विक्रेते आठ ते दहा रुपये दराने या पुडयाची विक्री करीत आहेत. सध्या शहरात विमल गुटखा पुडी चे पॅकेट १८० रुपयात, मोठी विमल गुटखा पूड़ीचे पॅकेट ११० रुपयांना, बाजीराव चे पॅकेट १४० रुपये, बाहुबली चे पॅकेट १७० ते १७५ रुपये तर राजनिवास गुटखा पुडीचे पॅकेट १७० रुपये प्रमाणे ठोक विक्रेते विकत आहेत. नव्याने आलेल्या या पुडयां मध्ये गुटख्याचा माल अगदी थोडा येत असल्याने एका पूड़ी ऐवजी गुटखा शौकिनांना दोन दोन पुड्या फोडून खाव्या लागत आहेत. गुटखा पुड़यांची साईज सुद्धा कमी झाल्याने गुटखा शौकीन नाराजी व्यक्त करीत आहेत. गुटखा पुड्यांच्या किमती वाढल्याने अनेक गुटखा शौकिन पानपट्टीवर मिळणाऱ्या तंबाखू युक्त घोटा अथवा खर्राकडे वळले आहेत

# रामनगरात काळा मारोती मंदिर समोरचा रस्ता रखडला

प्रतिनिधी ६ मार्च

### ◆ रहदारीच्या रस्त्यावरून वाहने चालवणे झाले कठीण



**अकोला :** रामनगर परिसरात रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी आहे. या भागात रूग्णालये, कोचिंग क्लासेस मोठ्या प्रमाणात आहे. तसेच हा रस्ता सतत वाहता राहतो. परंतु उपरोक्त रस्ता गेल्या अनेक दिवसापासून रखडलेला आहे. नागरिकांना येता जाता अडचण होत आहे. त्यामुळे रस्ता दुरूस्ती तातडीने करण्यात यावे अशी मागणी आहे.

या रस्त्याचे काम अर्धवट आहे. सध्या गिट्टी टाकून ठेवलेली आहे. त्यामुळे वाहने व्यवस्थित चालवता येत नाही. पायी चालणे देखील कष्टाचे झाले आहे. काही दिवसांपासून ही स्थिती आहे. त्यामुळे रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याकडे संबंधितांनी लक्ष द्यावे अशी मागणी आहे. कारण दररोजच्या त्रासाला लोक कंटाळले आहेत. काम खोळंबल्यामुळे या भागातील नागरिक नाराजी व्यक्त करीत आहेत.

# जिल्हा परिषदेत आरोग्य तपासणी शिबीर

प्रतिनिधी ६ मार्च

**अकोला :** ३जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा परिषदेत महिलांसाठी आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.

जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत महिला कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या आरोग्याची सर्वांगीण तपासणी करण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा कार्यक्रम अधिकारी राजश्री कोलखेडे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांच्या नियोजनातून शिबिर राबविण्यात आले.

# सर्वोपचार रुग्णालयाच्या मार्गावरील खोदकामामुळे रुग्ण हैराण

### रुग्णालयात पोहोचताना आपत्कालीन रुग्णांनाही त्रास

प्रतिनिधी ६ मार्च



**अकोला :** येथील सर्वोपचार रुग्णालय परिसरात सध्या पाईपलाईनसाठी खोदकाम सुरू आहे. मात्र, या कामामुळे रुग्णालयात ये-जा करणाऱ्या रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. परिस्थिती अशी आहे की, आपत्कालीन रुग्णांनाही वेळेवर रुग्णालयापर्यंत पोहोचवण्यात अडचणी येत आहेत.

सर्वोपचार रुग्णालयात पाईपलाईन टाकण्यासाठी रस्ता खोदण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. परंतु, या कामामुळे रुग्णालय परिसरातील येण्या-जाण्याचा मार्ग पूर्णपणे खराब झाला आहे. खराब रस्ता, खड्डे आणि सगळीकडे पसरलेल्या मातीमुळे रुग्ण, त्यांचे नातेवाईक आणि रुग्णालय कर्मचाऱ्यांना दररोज मनस्ताप सहन करावा लागत आहे. अनेकदा तर रुग्णवाहिका आणि इतर वाहनांनाही रुग्णालय परिसरात शिरताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतोय. सर्वात गंभीर परिस्थिती तेव्हा निर्माण होते, जेव्हा एखाद्या आपत्कालीन रुग्णाला तातडीने रुग्णालयात पोहोचवणे गरजेचे असते. अशा वेळी रस्त्याच्या दुरवस्थेमुळे वेळेवर उपचार मिळण्यास उशीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, रुग्णालयासारख्या संवेदनशील ठिकाणी काम करताना प्रशासनाने पर्यायी रस्त्याची व्यवस्था करायला हवी होती, जेणेकरून रुग्णांचे हाल झाले नसते.

# अकोल्यात 'स्व. तुकाराम बिडकर त्रिस्तरीय पुरस्कार' वितरीत

प्रतिनिधी ६ मार्च






### ◆ ललित काळपांडे, निलेश जळमकर व सदानंद जाधव यांचा गौरव

**अकोला :** स्व. तुकाराम बिडकर ग्राम विकास प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारे मानाचे त्रिस्तरीय पुरस्कार आज प्रदान करण्यात आले. यामध्ये शिक्षण क्षेत्रात ललित काळपांडे, कला क्षेत्रात निलेश जळमकर आणि क्रीडा क्षेत्रासाठी सदानंद जाधव यांचा गौरव करण्यात आला. यावेळी रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरु विनायक देशपांडे यांची विशेष उपस्थिती होती.

स्व.तुकाराम बिडकर स्मृती शिक्षण क्षेत्रातील ज्ञानरत्न पुरस्कार हा ग्रामीण भागातील १० हजार अभियंते आणि ७ हजार डॉक्टर्स घडविल्याबद्दल ललित काळपांडे यांना प्रदान करण्यात आला. तर 'डेबू', 'महानायक', 'सत्यशोधक' यांसारख्या सामाजिक व वैचारिक चित्रपटांच्या माध्यमातून समाजप्रबोधन केल्याबद्दल कलारत्न पुरस्कार निलेश जळमकर यांना देण्यात आला. 'एकलव्य कला अकादमी'च्या माध्यमातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार केल्याबद्दल क्रीडारत्न पुरस्कार सदानंद जाधव यांचा गौरव केला गेला. कार्यक्रमाला रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरु विनायक देशपांडे, महापौर शारदाताई खेडकर, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, उपमहापौर अमोल गोगे, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री गुलाबराव गावंडे, माजी आमदार दाळू गुरुजी,माजी आमदार हरिदास भदे, जयंत मसने यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. हा पुरस्कार सोहळा



प्रमिलाताई ओक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. स्व. तुकाराम बिडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून मान्यवरांच्या शुभहस्ते हे पुरस्कार वितरित केले जातील.ग्रामीण भागातील तरुण पिढीला समाज आणि राष्ट्र निर्मितीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्व. तुकाराम बिडकर यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. त्यांचे हे कार्य अविरत सुरू राहावे, या उद्देशाने या पुरस्कारांची सुरुवात करण्यात आली आहे, असे अध्यक्ष शत्रुघ्न बिडकर यांनी नमूद केले. या प्रसंगी संस्थेचे मार्गदर्शक राधाताई बिडकर, प्रकाश बिडकर, गजानन म्हैसने, गजानन इंगळे, डॉ. रमेश बरडे, अनिल मालगे,वामनराव तायडे,विनोद मिरगे,विठ्ठल इंगळे,राजेंद्र जळमकर यांसह फाउंडेशनचे इतर पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. स्व. तुकाराम बिडकर ग्राम विकास प्रतिष्ठान चे अध्यक्ष शत्रुघ्न बिडकर यांच्या संकल्पनेतून हा पुरस्कार सोहळा रंगला आणि त्याचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल सर्वांनी त्यांचे कौतुक केले.

# अकोल्यात मनपा शाळा क्र. 4 चा 'वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा'

प्रतिनिधी ६ मार्च

### ◆ कार्यक्रमाचे आयोजक राजेशदादा गावंडे यांचा पुढाकार



**अकोला :** विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आणि शाळेच्या यशस्वी वाटचालीचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी, महानगरपालिका मराठी मुलांची शाळा क्रमांक ४, रामदास पेठ येथे 'वार्षिक स्नेहसंमेलन' सोहळ्याचे शानदार आयोजन करण्यात आले होते. स्थानिक मौलाना अबुल कलाम आझाद हॉलमध्ये हा कार्यक्रम झाला.

या सोहळ्याला शहराच्या महापौर शारदाताई रणजीत खेड़कर आणि उपमहापौर अमोल गोगे , काँग्रेस कमिटीचे प्रदेश महासचिव महेश गणगणे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महिला व बालकल्याण सभापती आरतीताई घोगालिया यांच्यासह अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व निमंत्रक म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष राजेशदादा गावंडे यांनी जबाबदारी सांभाळली, तर समितीचे अध्यक्ष उमेशभाऊ लख्खन यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवले. 'विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा बहारदार आविष्कार' या ब्रीदवाक्याला जागून, शालेय विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यामध्ये नृत्य, नाट्य आणि संगीत सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली. मान्यवरांच्या उपस्थितीने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला होता. याप्रसंगी बोलताना शिक्षणाधिकारी हरिश्चंद्र इटकर, श्रीधर भिरड, भीमराव डोंगरे, आणि इतर मान्यवरांनी शाळेच्या प्रगतीचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माजी मुख्याध्यापिका विद्याताई गोटे, शाळा व्यवस्थापन समितीचे तज्ज्ञ मुकुंद देशपांडे, आणि शाळेच्या मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकांनी अथक परिश्रम घेतले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK